मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

»मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
»पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
»नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
»वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

पालघर-ठाणे | रायगड - रत्नागिरी | RNI No.: MAHAMAR/2014/62313 | » मंगळवार, १७ जून २०२५ | » वर्ष: ११ » अंक: २०८ | » पाने-८ | » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## अमेरिकेची युद्धनौका मध्य आशियाकडे रवाना

**वॉशिंग्टन, दि. १६ प्रतिनिधी**

इराण-इस्रायल संघर्ष पेटलेला असताना अमेरिकन नौदलाचं विमानवाहू जहाज यूएसएस निमित्ज सोमवारी सकाळी दक्षिण चिनी समुद्रातून पश्चिमेच्या दिशेनं रवाना झालं आहे. शिप ट्रॅकिंग वेबसाईट मरिन ट्रॅफिक यांनी ही माहिती दिलेली आहे. व्हिएतनामच्या डानांग शहरातील पोर्ट कॉलमध्ये निमित्ज कॅरिअरसाठी एका सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. पण तो सोहळा रद्द करण्यात आलेला आहे. इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष पेटलेला असताना निमित्ज कॅरिअर मध्य आशियाच्या दिशेनं रवाना झालेलं आहे. निमित्ज कॅरिअर २० जूनला डानांग शहरात पोहोचणार होतं. त्या दिवशी तिथे औपचारिक स्वागत सोहळ्याचं आयोजन करण्यात आलेलं होतं. पण आता हा सोहळा रद्द करण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्यानं दिली आहे.

# जनगणनेची औपचारिक अधिसूचना जारी

## देशभरात दोन टप्प्यांत जनगणना होणार

**नवी दिल्ली, दि. १६ वृत्तसंस्था**

जनगणनेची दीर्घकाळापासूनची प्रतीक्षा अखेर संपली आहे. गृह मंत्रालयाने आज जनगणना कायदा, १९४८ अंतर्गत जनगणना आणि जातींच्या जनगणनेशी संबंधित अधिकृत राजपत्र अधिसूचना जारी केली आहे. अधिसूचनेनुसार, जनगणना २०२७ मध्ये केली जाईल. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन आणि भारताचे रजिस्ट्रार जनरल मृत्युंजय कुमार नारायण यांच्याव्यतिरिक्त, इतर अनेक उच्च अधिकारी बैठकीत उपस्थित होते.

लडाख, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यात १ ऑक्टोबर २०२६ पासून जनगणना सुरू होणार आहे. देशातील उर्वरित भागात ही प्रक्रिया १ मार्च २०२७ पासून सुरू होईल, असे अधिसूचनेमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. जनगणनेचा प्राथमिक डेटा मार्च २०२७ मध्येच प्रसिद्ध केला जाईल. तथापि, तपशीलवार डेटा प्रसिद्ध होण्यासाठी वर्षाच्या अखेरपर्यंत वाट पहावी लागेल. जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया सुमारे २१ महिन्यांत पूर्ण होईल.



देशभरात दोन टप्प्यात जनगणना होणार आहे. १ मार्च २०२७ च्या मध्यरात्रीपर्यंत लोकसंख्या आणि सामाजिक स्थितीचा डेटा रेकॉर्डमध्ये नोंदवला जाईल. पहिल्या टप्प्यात घरांची यादी ऑपरेशन (HLO) मध्ये प्रत्येक घराची निवासी स्थिती, मालमत्ता आणि सुविधांची माहिती गोळा केली जाईल. यानंतर दुसऱ्या टप्प्यात, लोकसंख्या जनगणनेत प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्तीची लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि इतर तपशील घेतले जातील.

**पहिला टप्पा**
**१ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार (हिमालयीन/बर्फाळ प्रदेश असलेल्या राज्यांमध्ये, जसे की जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड)**
**दुसरा टप्पा**
**१ मार्च २०२७ पासून सुरू होणार (उर्वरित भारत)**

### ३५ लाख कर्मचारी डिजिटल पद्धतीने करणार जनगणना

यावेळी सुमारे ३४ लाख प्रगणक आणि पर्यवेक्षक आणि सुमारे १.३ लाख जनगणना अधिकारी जनगणनेच्या कामासाठी तैनात केले जातील. जनगणना मोबाईल ॲप्लिकेशन वापरून डिजिटल पद्धतीने केली जाईल. लोकांना स्व-गणनेची सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाईल. भारतात १८७२ मध्ये जनगणना प्रक्रिया सुरू झाल्यापासून ही १६ वी जनगणना आहे. तर स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना आहे.

### स्वातंत्र्यानंतर प्रथमच जातनिहाय जनगणना

भारतात स्वातंत्र्यानंतर प्रथमच जातनिहाय जनगणना होणार आहे. यासाठी, जनगणना प्रश्नावलीमध्ये जातीचा एक नवीन स्तंभ तयार केला जाईल. गेल्या काही वर्षांपासून जातींची गणना हा एक प्रमुख राजकीय आणि निवडणूक मुद्दा बनला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह राजद आणि समाजवादी पक्षासारखे विरोधी पक्ष जातीय जनगणना करण्याची मागणी करत होते.देशातील शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती. कोरोना साथीमुळे २०२१ ची जनगणना पुढे ढकलण्यात आली होती, त्यामुळे पुढील जनगणना १६ वर्षांनी होत आहे.

## अग्रलेख खरीखरी

### नक्कीच, जातनिहाय जनगणना होणार!

अखेर जातनिहाय जनगणनेची अधिसूचना जाहीर झाली. ज्या जनगणनेची आवश्यकता विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी वारंवार व्यक्त केली होती. ती आता प्रत्यक्षात उतरत आहे. जेव्हा जेव्हा राहुल गांधी जातनिहाय जनगणनेची चर्चा करीत होते. तेव्हा त्यांच्यावर बेंबीच्या देठापासून ओरडत ओरडत हल्ला करण्यात येत होता. परंतु जेव्हा जातीनिहाय जनगणनेची चर्चा जमिनीपासून आस्मानापर्यंत फैलावत गेली. तेव्हा त्याचे महत्त्व मोदीजींनाही कळून चुकले. हवेची दिशा कोणती आहे, जनतेच्या मनात काय आहे, जनतेची नाडी कधी पकडावी, जनतेशी आपली नाळ कशी जोडावी. त्यासोबतच जनतेच्या मनातील अंतर्ध्वनी कसा ओळखावा, जनतेला आकर्षित करण्यासाठी कोणती कृती करावी, जनतेच्या मनातील मन की बात कशी ओळखावी, जनमानसाच्या हृदयाला हात कसा घालावा आणि जनतेला घोषणांच्या क्षीरसागरात आनंदाचे भरते कसे आणावे. या सर्व प्रकारांमध्ये आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी अत्यंत पारंगत आहेत. या सर्व गोष्टींमध्ये ते किती पारंगत आहेत. हे सांगायची गरज नाही. कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नाचे श्रेय विरोधकांना घेऊन द्यायचेच नाही. हे त्यांचे सूत्र आपण आतापर्यंत बघितलेले आहे. आता जातनिहाय जनगणना हा मुद्दा आपल्या कवेत घेऊन मोदीजींनी आपल्या भक्तांना तरबेज करून टाकलेले आहे. ही जनगणना अगदी व्यवस्थित पार पाडावी. म्हणून दुरांतोसारखी गती घेऊन ही जनगणना व्यवस्थित पार पडणार नाही. अशी मोदीजींची ठाम समजूत आहे. म्हणूनच भारतातील बंद पडलेल्या अनेक पॅसेंजर गाड्यांप्रमाणे ही जातीनिहाय जनगणना संथगतीने परंतु योग्य दिशेने करण्याचे कार्य आता सरकार करणार आहे. या जनगणनेचा पहिला टप्पा १ ऑक्टोबर २०२६ या तारखेपासून सुरू होणार आहे. मुहूर्ताचा पहिला टप्पा बरोब्बर वर्षभर चालेल. त्यात जातीय जनगणना बिनचूक व्हावी, हाच या सर्वामागचा उद्देश असेल असे समजण्यास हरकत नाही. अधिसूचना आज जाहीर झाली असली. तरी पहिल्या टप्प्याची सुरुवात करण्यासाठी सरकार जवळ यापुढे १४ ते १५ महिन्यांचा कालावधी आहे. हा अवधी भरपूर आहे. २०२६ च्या महात्मा गांधींच्या जन्मदिनाच्या म्हणजेच जयंतीच्या पूर्वसंध्येला हे पवित्र कार्य सुरू होईल. विनाकारण गडबड घाई करून जनगणना उरकण्याचा सोपा मार्ग सरकार अवलंबणार नाही. हीच चांगलीच गोष्ट आहे. हा पहिला टप्पा संपल्यावर दुसरा टप्पा साधारण १ मार्च २०२७ ते २८ या कालखंडात सुरू राहील. कदाचित तिसरा टप्पा किंवा अखेरचा टप्पा २०२९ च्या निवडणुकीआधी पूर्ण करण्यात येईल, असा आमचा अंदाज आहे. म्हणजे मागच्या निवडणुकीत राहुल गांधींनी प्रत्येक प्रचार सभेत जातीय जनगणना हा मुद्दा उचलून लोकांच्या मनात या जनगणने बद्दलची जिज्ञासा उत्पन्न केली होती. ती आपोआपच शांत होईल. असा अत्यंत साधासुधा हिशोब आहे. या मुद्द्यावर आता कुणालाही वेगळे मुद्दे मांडून गुद्दे लगावता येऊ नये. याची संपूर्ण तयारी करण्यात येत आहे. ही सरकारची कौशल्य योजना निश्चितपणे अभिनंदनच पात्र आहे. या जनगणनेनंतर त्याचा निकाल येण्यासाठी २०२९ च्या निवडणुकांचा निकाल येणे अपेक्षित असेल. मग या जटील कोष्टकाचा उलगडा कसा हळुवारपणे करण्यात येणार आहे. हे आपण समजून घेतले पाहिजे. आपल्या सरकारला जे करायचे असते. ते तर सरकार करतेच. पण जे करायचे नसते आणि जे जनतेला हवे असते. तेही आपण करतो असे दाखवायचे असते. याबाबतीत पक्षीय प्रवक्ते आणि एकपक्षीय वृत्तवाहिन्या या सगळ्याच गोष्टींचा जयजयकार करण्यासाठी आतुरतेने सज्ज असतात. आम्ही वरच उल्लेख केलेला आहे की, कोणत्या मुद्द्यावर जनतेची नाडी पकडता येते. तेच मुद्दे हाती घेऊन हाती असलेल्या यंत्रणेचा उपयोग करणे, यात आपले सरकार माहीर आहे. आता आपण एकच आशा करूया. निदान या प्रश्नाचे उत्तर २०२९ च्या मे-जून नंतर तरी मिळावे, अशी आशा करूया. कारण तेव्हा बहुधा लोकसभेची निवडणूक मोदीजींनी जिंकलेली असेल आणि जनतेला या प्रश्नाचे उत्तरही दिसेल. ही आशा करण्यात काही चुकीचे नाही. सरकारच्या जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयाचा आपणही आदर करावा आणि जेव्हाकेव्हा जनगणना करणारे कर्मचारी आपल्या दारी येतील. तेव्हा तेव्हा त्यांना सविस्तर माहिती द्यावी. म्हणजे त्यांचाही उद्धार होईल. एवढेच या निमित्ताने सांगावयाचे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## गिरगाव मेट्रो स्थानकाजवळ रस्ता खचला

### बेस्ट बस अडकली 5 फूट खड्ड्यात सुदैवाने प्रवासी सुखरूप

**गजानन तुपे**
**मुंबई, दि. १६**

मुंबईच्या गिरगाव परिसरात सोमवारी सकाळी एक धक्कादायक घटना घडली. ठाकूरद्वार सिग्नलजवळ मेट्रोचे काम सुरू असलेल्या ठिकाणाच्या अगदी जवळून जात असताना बेस्टची एक बस अचानक रस्ता खचल्याने पाच फूट खोल खड्ड्यात अडकली.

गिरगावातील ठाकूरद्वार सिग्नलजवळ मुंबई मेट्रोचे खोदकाम सुरू आहे. त्याच भागात रस्त्याच्या समांतर बाजूने बेस्टची बस प्रवाशांसह जात होती. मात्र, अचानक बसच्या मागच्या चाकाखालील रस्ता खचला आणि ती बस पाच फूट खोल खड्ड्यात अडकली. या भागात मेट्रोचे काम सुरू असल्यामुळे जमीन कमकुवत झाली होती, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेच्या वेळी बसमध्ये सुमारे ३५ ते ४० प्रवासी होते. मात्र सुदैवाने कुठलीही जीवितहानी झालेली नाही. पण बेस्ट बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, हा रहदारीचा रस्ता असून सकाळी चाकरमान्यांची संख्या मोठ्या प्रमाणात या रस्त्यावर असते. त्यामुळे बेस्ट वाहतूक देखील या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात होते. त्यातच मेट्रो मुंबई मेट्रो लाईन 3 चे काम या परिसरात सुरू आहे. आणि आज सोमवारी सकाळी नऊ ते साडेनऊ वाजेच्या सुमारास ही घटना घडली.



वाहतूक पोलीस आणि मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांमुळेच हे परिस्थिती उद्भवली आहे, असा संताप स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे. तर, या रस्त्यावरून जात असताना अचानक मागचे टायर खड्ड्यामध्ये अडकले. बसमधील प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात आले असल्याची माहिती बस चालकाने दिली आहे. आता ही खड्ड्यातून बाहेर काढण्यात आली आहे.

# मुसळधार पावसाने राज्याला झोडपले

## २४ तासांत १८ जणांचा मृत्यू

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

राज्यात रविवारपासून तळ ठोकलेल्या पावसाने सोमवारीही झोडपून काढले. मुसळधार पाऊस झाल्याने सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगडसह कोकण किनारपट्टीसह अनेक भागांत पूर स्थिती निर्माण झाली होती. मागील २४ तासांत १८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.

राज्यात यंदा मे दुसऱ्या आठवड्यात पावसाने आगमन झाले. सलग दोन आठवडे राज्यभरात धो धो पाऊस झाला. अधून मधून सरी, रिप रिप करणाऱ्या पावसाने मागील दडी मारली. खरिपाच्या पेरण्या करण्यास अवधी मिळाल्याने शेतकरी वर्ग सुखावला होता. शहरी भागांत उकाड्यामुळे नागरिक हवालदिल झाले होते. अखेर रविवारी १५ जूनपासून पुन्हा एकदा पावसाला सुरूवात झाली. पहाटेपासून रिपरिप करणाऱ्या पावसाने सकाळी ११ वाजता जोर धरला.



सोमवारी १६ जूनला राज्यभरात पावसाची दिवसभर तुफान बॅटींग सुरू होती. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड कोकण किनारपट्टीत वादळीवाऱ्योने झोडपून काढले. अनेक भाग पाण्याखाली गेले होते. रत्नागिरीतील जगबुडी नदीने धोक्याची इशारा पातळी ओलांडली. वाशिष्ठी, सावित्री नदीला पूर आला होता. नागरीकांना त्यामुळे सतर्क राहावे. प्रशासनामार्कत एनडीआरएफ व एसडीआरएफ स्थानिक यंत्रणांनी समन्वय साधून मदतीच्या सूचना आपत्कालीन नियंत्रण कक्षाकडून देण्यात आल्या आहेत.

- **रत्नागिरी – ११२.७ मि. मी.**
- **सिंधुदुर्ग – ११०.७ मि. मी.**
- **मुंबई शहर – १००.४ मि. मी.**
- **मुंबई उपनगर – ८६.० मि. मी.**
- **रायगड – ७२ .१ मि. मी.**

दरम्यान कोकणातील रायगड, रत्नगिरी या जिल्ह्यांना रेड अलर्ट दिला आहे. तर अहिल्यानगर, धुळे, नंदुरबार, पालघर, मुंबई, सिंधुदुर्ग, ठाणे, पुणे, सातारा, नाशिक, मुंबई उपनगर, जालना या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. कोल्हापूर घाट, पुणे घाट, सातारा घाट, यांनाही ऑरेंज अलर्ट देण्यात आला आला आहे.

गेल्या २४ तासात मोठ्या प्रमाणात पाऊस सुरु आहे. पडझडीच्या घटना, रस्ते अपघात, भिंत पडून, नाल्यात पडून, नदीवरील लोखंडी पूल पडून, पाण्यात पडून, दरीत पडून अशा विविध कारणामुळे १८ लोकांचा मृत्यू झाला. तर ६५ लोक जखमी झाले आहेत. अशी माहिती राज्य सरकारने दिली आहे.

## मुंबई-गोवा महामार्ग खचला, जगबुडी नदीने गाठली धोक्याची पातळी

**खेड, दि. १६ प्रतिनिधी**

मागील २४ तासांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे खेड तालुक्यात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर कशेडी ते परशुराम घाटदरम्यान अनेक ठिकाणी रस्ता खचल्याच्या घटना घडल्या असून वाहतुकीसाठी अडथळे निर्माण झाले आहेत.

मौजे कळबनी बुद्रुकजवळील वाळजवाडी येथे असलेला पूल पूर्णपणे धोकादायक स्थितीत आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना मोठमोठ्या भेगा पडल्याने या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत धोक्याचे ठरत आहे.

या महामार्गावर सुरू असलेल्या चार पदरी रस्त्याच्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेले असावे, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. एवढी गंभीर स्थिती असतानाही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची आपत्कालीन यंत्रणा अद्याप घटनास्थळी पोहोचलेली नाही, हे चिंतेचे कारण ठरत आहे. नागरिकांनी या मार्गावरून प्रवास करताना अतिशय काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



दरम्यान, तालुक्यातील जगबुडी नदीने ६.४० मीटरची धोकादायक पातळी गाठली असून, अनेक परिसर जलमय होण्याचा धोका निर्माण झाला आहे. मागील २४ तासांत खेडमध्ये १०७ मिमी पावसाची नोंद झाली आहे, तर हंगामातील एकूण पावसाचा आकडा ७५० मिमी पार झाला आहे.

पावसामुळे पाणीपुरवठा व्यवस्थाही कोलमडली आहे. जगबुडी नदीखालून जाणारी मुख्य पाईपलाईन पुन्हा फुटल्याने खेड शहरातील पाणीपुरवठा पूर्णतः ठप्प झाला आहे. नदीची वाढलेली पातळी आणि वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, यामुळे दुरुस्तीचे काम अद्याप सुरू होऊ शकलेले नाही.

अशातच, श्री खेडजाई रेडजाई मंदिर परिसरातून सुसेरी गावाकडे जाणाऱ्या मार्गावर नारिंगी नदीने रस्ता ओलांडल्याने नागरिक अडकण्याचे प्रकार घडू लागले आहेत. सुदैवाने, १६ जून रोजी एक महिला अडकली असताना 'विसर्जन कट्टा' टीमने तातडीने धाव घेत तिचा जीव वाचवला.

एकूणच खेड तालुक्यात पूरजन्य परिस्थिती गंभीर बनली आहे. हवामान विभागाने अधिक पावसाचा इशारा दिल्याने नागरिकांनी घरातच थांबावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पालकमंत्रिपद हवेच असे नाही - छगन भुजबळ

**नाशिक, दि. १६ प्रतिनिधी**

रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा विषय सातत्याने चर्चेत आहे. नाशिकमध्ये कुंभमेळा होणार आहे, त्यामुळे पालकमंत्र्यांची नियुक्ती आणि महायुतीत कोणाकडे पालकमंत्रिपद जाणार, याबद्दल राजकीय वर्तुळात उत्सुकताही आहे. छगन भुजबळ मंत्री झाल्याने वरिष्ठ मंत्री म्हणून त्यांच्याकडे पालकमंत्री पद जाईल, अशा चर्चा सुरू झाल्या. पण, भुजबळांनीच आता रस नसल्याचे म्हटले आहे.



नाशिक दौऱ्यावर आले असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. नाशिक शहरातील वाहतूक व्यवस्थेची पाहणी करत असताना छगन भुजबळ यांनी पालकमंत्रिपदाबद्दल भाष्य केले.

'सिंहस्थापूर्वी कामे मार्गी लागणे महत्त्वाचे आहे, त्यासाठी पालकमंत्रिपदच हवे असे नाही. आणि पालकमंत्रिपदासाठी आपला हट्टही नाही', असे वक्तव्य अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

मंत्री भरत गोगावले यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील निर्णयप्रक्रियेविरोधात केलेल्या वक्तव्याबाबत बोलताना भुजबळ म्हणाले, 'आमच्या काळात सर्व निर्णय बाळासाहेब ठाकरे हेच घ्यायचे आता कोण घेते ते माहीत नाही.

'मी सेनेतून बाहेर पडल्यानंतर पुन्हा तिथे जाण्याचा प्रश्न नव्हता. त्यामुळे माझा प्रवेश कोणामुळे थांबला, या वक्तव्याला महत्त्व नाही', असेही भुजबळ यावेळी म्हणाले.

मंत्रिपद मिळाल्यानंतर पालकमंत्रिपदाची जबाबदारी सोपविली जाईल, असा अंदाज बांधला जात होता. मात्र दरम्यानच्या काळात कुंभमेळ्याच्या बैठकीच्या निमित्ताने नाशिकमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री नसला तरी कुंभमेळा मंत्री आहे, ते कमी पडले तर आम्ही आहोतच असे सांगून एकप्रकारे पालकमंत्री नेमला जाणार नसल्याचे संकेत दिले होते.

## नीटमध्ये गुण वाढवून देण्याचे आमिष

### सीबीआयकडून दोघे अटकेत

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

नीट परीक्षेतील गुण वाढवून देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची आणि पालकांची फसवणूक करणाऱ्या दोघा खासगी व्यक्तींना सीबीआयने अटक केली आहे. संदीप शहा (मूळ गाव सोलापूर), सलील खुदबुद्दीन पटेल (कोतीज, ता. कडेगाव, जि.सांगली, सध्या नवी मुंबई ) अशी आरोपींची नावे असून सूत्रधार फरार असून, त्याचा शोध घेतला जात आहे. त्यांनी बनावट दावे करत एनटीए अधिकाऱ्यांशी संबंध असल्याचे सांगून गुण वाढविण्यासाठी प्रतिविद्यार्थी ९० लाख रुपये मागितले होते. दि. ९ जून २०२५ रोजी या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्राथमिक तपासात आरोपींनी पालकांना मुंबईतील आयटीसी ग्रँड सेंट्रल हॉटेलमध्ये भेटून नीटच्या गुणांमध्ये फेरफार करून देण्याचे आश्वासन दिले होते. इतकेच नव्हे, तर निकाल जाहीर होण्यापूर्वी सहा तासांपूर्वी वाढविलेले गुण कळवण्याचेही आश्वासन दिले होते.



## शाळेच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

**पालघर, दि. १६ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा दुर्वेस, पालघर येथे 'शाळा प्रवेशोत्सव 2025-26' निमित्त उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आश्वासक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान त्यांनी वृक्षारोपणही केले. यामाध्यमातून त्यांनी पर्यावरणाची कास धरत हरित महाराष्ट्राच्या निर्मितीचा संदेश दिला. या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके आणि गणवेशाचे वाटप करण्यात आले.

# बच्चू कडू जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरुन अपात्र

**अमरावती, दि. १६ प्रतिनिधी**

प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांच्या बाबतीत एक मोठी बातमी समोर आली आहे. अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्ष पदावरून बच्चू कडू यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. विभागीय सहनिबंधक यांनी हा निर्णय घेत बच्चू कडू यांना मोठा दणका दिलं आहे. न्यायालयाच्या एक वर्षाच्या शिक्षेचा ठपका ठेवत बच्चू कडू यांच्याबाबत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.



बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड यांच्यासह ११ संचालकांनी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना बँकेच्या संचालक पदावरून अपात्र करण्याबाबतची याचिका दाखल केली होती. नाशिक न्यायालयाने बच्चू कडू यांना एका प्रकरणात एका वर्षाची शिक्षा ठोठावली असल्याचा दाखला त्यांनी यामध्ये दिला. याचा आधार घेत विभागीय सहनिबंधक यांनी आपणास अपात्र का करण्यात येऊ नये, तसेच पुढील पाच वर्षाकरीता आपणास सदरचे पद धारण करण्यास अपात्र का करू नये? अशी नोटीस बच्चू कडू यांना बजावण्यात आली होती. २४ फेब्रुवारीला दुपारी ३ वाजता साक्ष नोंदविण्याकरिता समक्ष अथवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे, असे नोटिसीत नमूद करण्यात आले होते. अशातच आता विभागीय सहनिबंधक यांनी हा निर्णय घेत बच्चू कडू यांना मोठा दणका दिलं आहे.

दरम्यान, २०१७ साली नाशिकच्या सरकारवाडी पोलीस ठाण्यात बच्चू कडू यांच्यावर शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी आणि मारहाण केल्या प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. नाशिकच्या विशेष न्यायालयाने २०२१ साली बच्चू कडू यांना एक वर्षापर्यंत कठोर कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या शिक्षेला बच्चू कडूंनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले असून हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. याच प्रकरणाचा दाखला देत विरोधी गटातील संचालकांनी बच्चू कडू यांना संचालक पदावरून हटवण्याची मागणी केली होती. बच्चू कडू यांना पंधरा दिवसात त्यांचं म्हणणं मांडण्याचे आदेशही त्यावेळी देण्यात आले होते. अशातच आता या प्रकरणाचा दाखला देत न्यायालयाच्या एक वर्षाच्या शिक्षेचा ठपका ठेवत बच्चू कडू यांच्याबाबत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींना सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

**सायप्रस, दि. १६ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आज सायप्रसमधील ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस III हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. सायप्रस प्रजासत्ताकाचे पहिले अध्यक्ष मकारिओस III यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार राष्ट्राच्या प्रशंसनीय सेवेसाठी राष्ट्रप्रमुख आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींना प्रदान केला जातो.

निकोसिया येथील राष्ट्रपती निवासस्थानी आजझालेल्या कार्यक्रमात सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोडोलाइड्स यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुरस्कार प्रदान केला.



या सन्मानाबद्दल पंतप्रधान मोदी यांनी क्रिस्टोडोलाइड्स यांच्यासह सायप्रसच्या जनतेचे आभार मानले.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, "सायप्रसमधील सर्वोच्च सन्मान ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस III या पुरस्काराने माझा सन्मान करण्यात आला याबद्दल मी सायप्रस सरकारचे आणि जनतेचे मनापासून आभार मानतो. हा सन्मान फक्त माझा नाही, तर १४० कोटी भारतीयांचा सन्मान आहे. हा त्यांच्या क्षमता आणि आकांक्षांचा सन्मान आहे. हा आपल्या देशाच्या सांस्कृतिक बंधुत्वाचा आणि "वसुधैव कुटुंबकम्" च्या विचारसरणीचा सन्मान आहे. मी हा सन्मान भारत आणि सायप्रसमधील मैत्रीपूर्ण संबंधांना आणि आपल्या सामायिक मूल्यांना आणि परस्पर समंजसपणाला समर्पित करतो. सर्व भारतीयांच्या वतीने मी अत्यंत नम्रतेने आणि कृतज्ञतेने हा सन्मान स्वीकारतो." ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस III हा सन्मान शांतता, सुरक्षा, सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि आपल्या लोकांच्या समृद्धीप्रती असलेल्या आपल्या अढळ वचनबद्धतेचे प्रतीक आहे. मी या सन्मानाचे महत्त्व समजतो आणि भारत आणि सायप्रसमधील संबंधांप्रती असलेली जबाबदारी म्हणून तो स्वीकारतो. भविष्यात भारत आणि सायप्रसमधील भागीदारी नवीन उंची गाठेल. एकत्रितपणे, आपण केवळ आपल्या दोन्ही राष्ट्रांची प्रगती मजबूत करू शकत नाही तर शांततापूर्ण आणि सुरक्षित जागतिक वातावरण निर्माण करण्यातही योगदान देऊ, असा विश्वासही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

# मनपाच्या शाळेत विद्यार्थ्यांचे औक्षण करून ढोलताशांच्या गजरात स्वागत
## महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप

पनवेल,दि.16 : पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या 10 शाळांमध्ये पहिल्या दिवशी 1 ली ते 7 वीच्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन, औक्षण करून ,ढोल ताशांच्या गजरात आज जोरदार स्वागत करण्यात आले. याचबरोबर'१०० शाळांना भेटी देणे' या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या पहिल्या दिवशी महापालिका अधिकाऱ्यांनी विविध शाळांना सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप केले. शासनाच्यावतीने '१०० शाळांना भेटी देणे' हा उपक्रम राबवण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. या उपक्रामांतर्गत अधिकाऱ्यांनी शाळांना भेट देऊन प्रवेशोत्सवात सहभागी होऊन पुस्तक वाटप करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या उपक्रमांतर्गत लोकनेते दि.बा. पाटील शाळेमध्ये अतिरीक्त आयुक्त गणेश




शेटे व उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन, पुस्तक वाटप करण्यात आले. तसेच शाळेची पाहणी करण्यात आली. यावेळी शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण व मुख्याध्यापक श्री. राठोड उपस्थित होते. तसेच अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी हिरवे गुरूजी मनपा प्राथमिक शाळा (दगडी शाळा) येथेही सदिच्छा भेट दिली. यावेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर ,शाळा व्यवस्थापन समिती मार्गदर्शक श्री.वत्सराज, व श्री.सुजित म्हात्रे उपस्थित होते. तर परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी मनपा प्राथमिक शाळा क्रमांक. 4 कोळीवाडा पनवेल येथे भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. उपायुक्त स्वरूप खारगे ह्यांनी मनपा प्राथमिक शाळा क्रमांक. ६ धाकटे खांदे पनवेल येथे भेट सदिच्छा भेट दिली. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे यांनी मनपा प्राथमिक शाळा तक्का येथे भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्य पुस्तके वाटप करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी माजी नगरसेवक जयंत पगडे, अजय बहिरा उपस्थित होते. तसेच लेखा परीक्षक निलेश नलावडे यांनी मनपा प्राथमिक शाळा पोदी येथे सदिच्छा भेट दिली. तसेच शाळेतील स्वच्छता आणि वर्ग पाहणी करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक मनोज भुजबळ आणि माजी नगरसेविका सुशीला घरत उपस्थित होते. शाळेच्या पहिल्या दिवशी झालेल्या स्वागताने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद सर्व उपस्थितांनाही आनंद देत होता.

# निकृष्ट कामांबाबत शेकापची पालिकेकडे तक्रार

नवीन पनवेल: पनवेल महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी रस्त्यांची व इतर विकास कामे सुरू आहेत. मात्र यातील काही कामे निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रार शेतकरी कामगार पक्षाने पालिकेकडे केली. याबाबत शेकापचे शिष्टमंडळ पालिका अधिकारी संजय कटेकर यांच्याकडे तक्रार घेऊन गेले होते. पनवेल परिसरात अनेक ठिकाणी महानगरपालिकेतर्फे कामे सुरू आहेत. अनेक ठिकाणची कामे संथ गतीने सुरू आहेत. तर काही ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे केली जात असल्याचे शेकापच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. आदई सर्कल जवळील काम देखील संथ गतीने सुरू आहे. कामोठे, कळंबोली, खारघर या ठिकाणची सिमेंट काँक्रीट करण्याची कामे रात्रीत उरकून घेतली जात आहेत. त्याला शेकापचा आक्षेप आहे. तसेच ही कामे सुरू असताना पनवेल पालिकेचे अधिकारी उपस्थित नसल्याचा आरोप देखील शेकापच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे जनतेचा पैसा असाच कुठेतरी खर्च केला जात आहे. जनतेचा पैसा असा वाऱ्यावर जाऊ देणार नसल्याचे शेकापने सांगितले. यातील काही निकृष्ट कामे स्वतः थांबवली असल्याचे माजी नगरसेवक प्रमोद भगत यांनी सांगितले. सत्ताधाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे आणि संगनमताने हा सर्व प्रकार सुरू असल्याचा आरोप शेकापच्या माजी नगरसेवकांनी केला. विकासाच्या नावाखाली निकृष्ट कामे जनतेच्या माथी मारली जात आहेत. याकडे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नाही तर आगामी भूमिका वेगळी



असेल असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी शेकाप पनवेल महानगरपालिका जिल्हा चिटणीस प्रकाश म्हात्रे, शेकाप पनवेल महानगरपालिका महिला जिल्हा सहचिटणीस तेजस्विनी घरत, पालिका माजी नगरसेवक प्रमोद भगत, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे, माजी नगरसेवक गोपाल भगत, शेकापचे कामोठे कार्याध्यक्ष गौरव पौडवाल, मधुकर सुरते, रमेश गोरे, बंटी पाटील, नंदकिशोर भोईर, समाजसेवक ज्ञानेश्वर गायकर उपस्थित होते.

# लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले नवोगतांचे स्वागत!

पनवेल: नवीन शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश केला असून दरम्यान रायगड जिल्हा परिषद कळंबोली प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत करत सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक व मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी नगरसेवक गोपाळ भगत, रविंद्र भगत, विजय खानावकर, राजेंद्र शर्मा, कळंबोली



भाजपचे माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, शाळा व्यवस्थापक संस्थेचे अध्यक्ष अनंत भगत व इतर मान्यवर उपस्थित होते.

# भाजप तर्फे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

पनवेल : भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग क्र. १९ - जुने सुतिकागृह विभागातर्फे गरजू विद्यार्थ्यांसाठी 'शालेय साहित्य वाटप' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात १५० हून अधिक विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप वरिष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, अध्यात्मिक प्रकोष्ठ अध्यक्ष संदीप लोंढे, पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत, प्रभाग क्र. १९ अध्यक्ष पवन सोनी यांच्यासह मान्यवर उपस्थित



होते. हा कार्यक्रम भाजप सरचिटणीस अमितजी ओझे आणि महिला मोर्चा अध्यक्षा रुचिता लोंढे यांच्या विशेष सहाय्याने यशस्वी करण्यात आला. अनिमेष ओझे, केदार रेवाळे, आकाश गाडे, प्रथम ठाकरे, अभि रिंगे, हिमांशु पाटील, रुद्र पाटील, तन्मय मोरे, शिवराज बोबडे आणि सर्व युवा टीमने कार्यक्रमाच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला.

# मुसळधार पावसामुळे घरावर झाड कोसळून नुकसान. सुदैवाने जीवितहानी नाही.

तळा: रात्रीपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे तळा शहरात घरावर झाड कोसळून नुकसान झाल्याची घटना घडली. सुदैवाने यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही.तळा तालुक्यात रविवारी रात्रीपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली. रात्रभर कोसळत असलेल्या पावसासह सोसाट्याच्या वाऱ्यामुळे तळा शहरातील परीट आळी येथील संतोष तळेकर यांच्या घरावर पहाटे भलेमोठे झाड कोसळले. यावेळी झालेल्या मोठ्या आवाजामुळे संतोष तळेकर व परिवार खडबडून जागे



झाले व घरावर भलामोठा झाड कोसळल्याचे पाहून त्यांनी सुरक्षित स्थळी आसरा घेतला.तसेच या घटनेची माहिती तळा तहसील कार्यालयाला दिली.घटनेची माहिती मिळताच तहसील कर्मचारी यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला.सुदैवाने या अपघातात कोणालाही दुखापत झाली नाही मात्र घरासमोरील संपूर्ण शेड कोसळून भिंतीला तडा जाऊन घराचे नुकसान झाले आहे.

# राजिप मराठी शाळेत प्रवेशोत्सव साजरा

तळा: तळा शहरातील रायगड जिल्हा परिषदेच्या तळे मराठी शाळेत नविन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या मुलांचे स्वागत करून प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावर्षी तळे मराठी शाळेत पहिली ते सातवी पर्यंत नवीन पंधरा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या सर्वांचे शाळेच्या वतीने भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे यांनी शाळेला भेट दिली असता त्यांच्या स्वागतार्थ विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली.तसेच त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके,गणवेश,शूज यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे यांनी सांगितले की तळे मराठी शाळा ही वर्षभर माझ्याकडे



दत्तक आहे.त्यामुळे तिची अधिक प्रगती कशी करता येईल यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करणार असून जिल्ह्यातील शाळांमध्ये सर्वात उत्तम कामगिरी या शाळेने केली असल्याने याचा अभिमान वाटत असल्याचे गौरवोद्गार काढले.याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भास्कर गोळे,नगरसेवक नरेश सुर्वे,मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर,सुनील बैकर,मित्तल वावेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# मोदी सरकारचे कार्य जनतेपर्यंत पोहचवा –आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या आतापर्यंतच्या अकरा वर्षाच्या कालावधीत खूप मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केली आहेत. गोरगरिबांसाठी विविध योजनांच्या माध्यमातूनही मोदी सरकारने काम केले. हे काम आपण लोकांपर्यंत पोहचवले पाहिजे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते खारघरमधील रामशेठ ठाकूर कॉलेज येथे आयोजित संकल्प से सिद्धी या कार्यशाळेत बोलत होते. केंद्र सरकारला अकरा वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताने पनवेल विधानसभा मतदारसंघातील पनवेल तालुका उत्तर मंडळाच्या वतीने संकल्प सिद्धी या कार्यशाळेचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातांमध्ये मृत पावलेल्या व्यक्तींना या वेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यशाळेला भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, पनवेल तालुका उत्तर मंडळाचे संपर्कप्रमुख राजेश भगत, अध्यक्ष दिनेश खानावकर, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरिश केणी, पापा पटेल, मन्सूर पटेल, माजी नगरसेविका मंजुळा कातकरी, महिला मोर्चा अध्यक्ष आशा बोरसे, रविकांत म्हात्रे, किरण दाभणे, सरचिटणीस विनोद घरत, अंकुश पाटील, समीर गोंधळी, सचिन वासकर, प्रभाकर जोशी, युवा मोर्चाचे अध्यक्ष आशिष कडू यांच्यासह पदाधिकारी, बूथ अध्यक्ष आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या अकरा वर्षाच्या कारकिर्दीत अनेक विक्रम प्रस्थापित केले. गोरगरिबांसाठी अनेक योजना राबविल्यामुळे ग्रामीण आणि शहरी गरीब वर्गाचा विश्वास मोदी सरकारने मिळवला. जगाच्या पाठीवर भारताची प्रतिमा उंचावण्याचे कामही




त्यांनी केले. आज सक्षम देश म्हणून भारताकडे आता पाहिले जातेय ही आपल्या भारताची ओळख होत चालली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपला देश ताकदीने उभा राहताना जगाला पाहायला मिळाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

# रायगड मध्येधान्य वितरणाचा सावळागोंधळ; तीन महिन्यांचे नाही, एकच महिन्याचे धान्य

अलिबाग: पावसाळ्यात ग्राहकांची धान्य मिळविण्यासाठी धावाधाव होऊ नये म्हणून पुरवठा विभागाने जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी देण्याचा निर्णय घेतला. त्याची जाहिरातबाजीदेखील मोठ्या प्रमाणात केली. परंतु, जून महिना संपण्याच्या मार्गावर असताना तीन महिन्यांचे धान्य दुकानांमध्ये पोहोचले नसल्याची माहिती समोर आली आहे. फक्त जून महिन्याचेच धान्य वितरीत झाले आहे. धान्य वितरणाच्या सावळागोंधळामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. रायगड जिल्ह्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारकांची संख्या 80 हजार 456 असून, त्यातील लोकसंख्या दोन लाख 51 हजार 626 इतकी आहे. प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांची संख्या तीन लाख 73 हजार 726 असून, त्यातील लोकसंख्या 15



लाख 10 हजार 883 इतकी आहे. जिल्ह्यातील पंधरा तालुक्यांतील एक हजार 451 रास्त भाव दुकाने आहेत. जिल्ह्यामध्ये अंत्योदय योजनेंतर्गत दोन हजार 815.96 क्विंटल आणि प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत सात हजार 519.415 क्विंटल असे एकूण दहा हजार 335.375 क्विंटल धान्य वाटप केले जाते. त्यामध्ये गहू आणि तांदूळ यांचा समावेश आहे. प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत प्रति लाभार्थी प्रति चार किलो तांदूळ व एक किलो गहू असे पाच किलो धान्य दिले जाते. तसेच, अंत्योदय योजनेंतर्गत प्रति शिधापत्रिकेला 25 किलो तांदूळ व दहा किलो गहू असे एकूण 35 किलो धान्य लाभार्थ्यांना वितरीत केले जाते. जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी वितरीत करण्याचा निर्णय पुरवठा विभागाने घेतला आहे. गुरुवारी (दि.13) जूनपर्यंत केवळ 15.2 टक्के धान्य वितरण झाले आहे. यामध्ये जून महिन्याचे सर्वाधिक असून, जुलै व ऑगस्ट महिन्याचे धान्य अत्यंत कमी असल्याची माहिती समोर येत आहे. त्यात तांदळापेक्षा गव्हाचा पुरवठा अधिक झाल्याची चर्चा आहे. धान्य वितरणामध्ये पुरवठा विभागाचा सावळागोंधळ निर्माण झाला आहे. त्यामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. तीन महिन्याचे धान्य एकाच दिवशी मिळणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# सुधागडात मुसळधार पाऊस, आंबा नदीला पूर शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांची शाळेला दांडी.

सुधागड: रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यासह इतर ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. मुसळधार पावसामुळे दि.१६ रोजी आंबा नदीला पूर आला असून जनजीवन विस्कळीत झाले. शाळेचा पहिला दिवस असतानाच भेरव येथील आंबा नदीच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने येथील विद्यार्थ्यांची मात्र शाळेला दांडी झाली. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार रायगड जिल्ह्यात दोन दिवस मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला . मुसळधार पावसामुळे सुधागड तालुक्यातील आंबा नदीला पूर आला असून भेरव येथील आंबा नदीवरील पूल पाण्याखाली गेला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शाळकरी विद्यार्थी व नोकरदार वर्गाची गैरसोय झाली. विद्यार्थ्यांचा शाळेतील पहिलाच दिवस होता मात्र स्कूल बस व एस टी बसेस नदीपलीकडे अडकून पडल्याने



विद्यार्थ्यांची शाळेला दांडी झाली. पुलाच्या दोन्ही बाजूला नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पुराच्या पाण्याने वाहून आलेला कचरा,लाकडाचे ओंडे हे पुलावर अडकले. त्यामुळे पुलावर मातीचे व कचऱ्याचे ढीग जमा झाले होते. मात्र स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्ते अतिश सागळे,सतीश मांढरे यांच्या मदतीने सामाजिक कार्यकर्ते ललित ठोंबरे यांच्या जेसीबी च्या सहाय्याने तो कचरा बाजूला करून वाहनांसाठी रस्ता मोकळा करण्यात आला व वाहतूक सुरळीत झाली.

# अवकाळी पावसाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत करा – स्वाती दबडे.

माणगाव: यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रासह बहुतेक जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाला. रायगड जिल्ह्यातील माणगाव, महाड, पोलादपूर, श्रीवर्धन या तालुक्यातील शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या पिकांचे तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशा मागणीचे निवे



शिवसेना दक्षिण रायगड जिल्हा संपर्क प्रमुख स्वाती सखाराम दबडे यांच्यावतीने माणगाव तहसील कार्यालय येथे माणगाव तहसीलदार यांना देण्यात आले. अवकाळी पावसामुळे शेतामधील भाताच्या पिकासह अन्य पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे . दुबार शेतकऱ्यांना देखील याचा मोठा फटका बसला आहे. अचानक अवकाळी पाऊस आल्याने प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून जनावरांसाठी चारा असलेले कडवळ व इतर चारा पीके पाण्याखाली वाहून गेली आहेत. तसेच दक्षिण रायगड जिल्ह्यातील माणगाव, महाड, पोलादपूर ,श्रीवर्धन या तालुक्यातील नागरिकांचा शेती हाच प्रमुख व्यावसाय असल्यामुळे अवकाळी पाउसामुळें पेरणी केली नसल्याने मोठ्या प्रमाणात येथील शेतकऱ्यांना फटका बसलेला आहे.वरील तालुक्यातील शेतकऱ्यांना दुबार पेरणी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळालेला नाही .त्यामुळे तेथील शेतकरी खूप चिंताग्रस्त असून ठिकठिकाणी वादळ पाऊस व या पावसामुळे झालेल्या संपूर्ण तालुक्यातील शेतकऱ्यांचे पिकांचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत करावी. अशी मागणी शिवसेना दक्षिण रायगड जिल्हा संपर्क प्रमुख स्वाती सखाराम दबडे यांनी केली आहे निवेदनाद्वारे केली आहे.

# नवी मुंबई पोलिसांनी आपल्या अधिकृत वेबसाईटमध्ये केल्या महत्त्वपूर्ण सुधारणा

पनवेल: पोलीस दलाने तंत्रज्ञानाच्या मदतीने नागरिक सेवा अधिक सुलभ व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलले आहे. त्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी आपल्या अधिकृत वेबसाईटमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या नव्या वेबसाईटमध्ये अनेक नव्या सुविधा समाविष्ट करून ती अधिक सुरक्षित व यूजर फ्रेंडली बनवण्यात आली आहे. हे बदल नागरिकांच्या वेळेची बचत, कार्यपद्धतीतील पारदर्शकता आणि पोलीस दलाबाबतचा विश्वास वाढवण्यासाठी महत्त्वाचे ठरत आहे. या नव्या वेबसाईटमुळे नवी मुंबई पोलिसांची प्रतिमा अधिक सकारात्मक होत असून इतर जिल्ह्यांसाठी ते दिशादर्शक ठरत असल्याचे सांगण्यात आले आहे. या नव्या संकेतस्थळांमध्ये उद्योगाशी संबंधित तक्रार करण्याची सुविधा, ई-तक्रार, नोकर नोंदणी फॉर्मची सुविधा, ज्येष्ठ नागरिक नोंदणी फॉर्म, हरवलेले / सापडलेले लेख, पोलिसांबद्दल आलेल्या अनुभवाची प्रतिक्रिया देण्याची सुविधा (फीडबॅक), भाडेकरूंची ऑनलाइन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच पोलीस भरती, जनजागृती व कार्यक्रमांची माहिती, इच्छुक उमेदवारांना पोलीस भरती संदर्भातील जाहिराती, पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया यांची माहिती वेबसाईटवर मिळणार आहे. तसेच पोलीस विभागाद्वारे राबवण्यात येणाऱ्या जनजागृती मोहिमा व उपक्रमांचा तपशीलही या संकेतस्थाळावर नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. या संकेतस्थळाचे डेटा सेक्युरिटीसाठी सेक्युरिटी ऑडिट करण्यात आले आहे. तसेच भारत सरकारच्या इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमकडून संकेतस्थळ सुरक्षित असल्याबाबतचे सीईआरटी-इन सिक्युरिटी प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे. नागरिकांना सकतस्थळ हाताळण्यास सुलभ असावे, याकरता चॅटवॉटचा समावेश सकतस्थळावर करण्यात आला आहे. नव्या सुविधांमुळे घरबसल्या पोलीस सेवा मिळत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः आयटी क्षेत्रातील कर्मचारी, गृहिणी आणि विद्याथ्र्यांमधून या अद्ययावत वेबसाईटचे स्वागत करण्यात येत आहे. वेबसाईटचा इंटरफेस आता अधिक आकर्षक, मोबाईल फ्रेंडली आणि बहुभाषिक बनवण्यात आला आहे. इंग्रजीसोबतच मराठी भाषेतही सेवा उपलब्ध असल्यामुळे अधिकाधिक नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# भाजपा सरचिटणीस हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

कामोठे: श्री. हर्षवर्धन पाटील, सरचिटणीस – कामोठे शहर मंडल यांच्या वाढदिवसानिमित्ताने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. या विशेष कार्यक्रमात गुणवत्तेच्या जोरावर यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. समाजात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत, हर्षवर्धन पाटील यांनी सामाजिक बांधिलकीचे हे एक सुंदर उदाहरण ठरले. हर्षवर्धन पाटील यांनी बऱ्याच सामाजिक कार्यात व कामोठे



येथील विविध विषयावर त्यांनी काम केलेलं आहे. विद्यार्थ्यांचे विषय असो किंवा सामाजिक विषय असो हर्षवर्धन पाटील हे हमेशाच यासाठी आग्रह असतात की होतकरून मुलांना ॲडमिशन पासून ते त्यांना सामाजिक मदत करत असतात त्यामुळे हर्षवर्धन पाटलांचा कामोठेमध्ये एक सुसंस्कृत अभ्यासू अशी त्यांची ओळख आज पनवेल मध्ये आहे. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी पण या कार्यक्रमास किंवा इतर सामाजिक कार्यात हातभार लावत असतात या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते भाजप आमदार श्री प्रशांत दादा ठाकूर विशेष उपस्थिती या कार्यक्रमास लाभलेली आहे. तसेच आमदार यांनी श्री हर्षवर्धन पाटील यांचं या कार्यक्रमासाठी कौतुक केलेला आहे असेच कार्यक्रम पुढे पण भाजपा करत करत राहील असे आश्वासन आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी दिलेला आहे या कार्यक्रमास माझ्यासह जिल्हाध्यक्ष श्री. अविनाशजी कोळी, श्री. नितीन पाटील, माजी विरोधी पक्ष नेते श्री. प्रीतम म्हात्रे, श्री. रविंद्र जोशी, पनवेल तालुका पूर्व मंडल अध्यक्ष श्री. भूपेंद्र पाटील यांची उपस्थिती लाभली. तसेच असंख्य कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमामुळे पुढील पिढी नक्कीच प्रेरणा घेणे महत्त्वाचे आहे

# रायगड जिल्हा परिषदेत प्राथमिक शाळा सुरव / निजामपूर शाळेत भव्य शाळा प्रवेशोत्सव

माणगाव: माणगाव तालुक्यातील सुरव तर्फे निजामपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये १६ जून २०२५ रोजी शाळा प्रवेशोत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षीही शाळेत पहिल्यांदाच इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या लहान मुलांसाठी एक भव्य स्वागत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शाळेत पहिल्यांदाच इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे ढोल ताश्याच्या गजरात वाजत गाजत मिरवणूकीने शाळेत आगमन झाले. गुलाब फुले आणि ओवाळणी करून त्यांचे आपलेपणाने स्वागत व्यवस्थापन समिती अध्यक्षा तेजस्विनी करकरे यांनी केले पहिलीमध्ये दाखल होणाऱ्या मुलांसाठी मनोहारी असे 'पहिले पाऊल' हे उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमात कागदावर पाऊलांचे ठसे घेण्याची अनोखी प्रथा ठेवण्यात आली, जी या मुलांसाठी नव्या शैक्षणिक वाटचालीची नांदी ठरली. शाळेच्या पहिल्याच दिवशीच मुलांना पाठ्यपुस्तके, गणवेश आणि शालोपयोगी साहित्याचे वाटप प्रमुख मान्यवरांकडून करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता वाढवळ मॅडम यांनी कार्यक्रमाला हजेरी लावून स्वागताची भावना व्यक्त केली. त्यांनी यंदापासून इयत्ता पहिली पासूनच CBSC



पॅटर्न अंमलात आणण्यात येणार असल्याची माहिती दिली, ज्यामुळे शिक्षणाच्या दर्जात वाढ होण्याची शक्यता आहे. या संदर्भात शाळेच्या मुलांना आणि पालकांना आनंदित होण्याचे कारण आहे. विद्यार्थ्यांना मिष्टांन्न भोजनाचा पोषण आहार देऊन कार्यक्रमाच्या विशेषत्वात भर पडली. सर्व कार्यक्रमांचे सूत्रसंचालन व आभार शिक्षक प्रदीप आडित यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नमिता लहाने, रसिका लहाने, मंजुळा लहाने, अंगणवाडी सेविका पल्लवी कोळेकर, रेखा लहाने आणि दीपिका लहाने यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमातील उत्साह, आनंद आणि एकात्मता पाहून, आपण असे म्हणू शकतो, की शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक लहान मुलाच्या आयुष्याला हा दिवस उज्ज्वल करणारा ठरू शकतो.

# शाळा प्रवेशोत्सव उत्साहात: नेणवली शाळेत प्रवेश दिंडी ढोल लेझीमच्या ठेक्यावर विद्यार्थ्यांना आणले शाळेत

पाली: जिल्ह्यातील शाळांत सोमवारी (दि.१६) शैक्षणिक वर्षाचा उत्साहात प्रारंभ झाला. सुधागड तालुक्यातील रजिप नेणवली शाळेत प्रवेशोत्सव, पुस्तक दिन गणवेश वाटप व विद्यार्थ्यांना गोडधोड खाऊ घालून 'शाळा प्रवेशोत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रवेश दिंडी काढण्यात आली. ढोल, लेझीमच्या ठेक्यावर दाखलपात्र विद्यार्थ्यांना शाळेत आणून प्रवेशद्वारावर त्यांना एक चित्र निवडण्यास सांगितले जसे नमस्कार, टाळी, नृत्य, आलिंगन हे विद्यार्थी निवडून शिक्षक तशी कृती करून त्यांच्या पायाचा ठसा घेऊन पहिलं पाऊल टाकून शाळा प्रवेश देण्यात आला. याप्रसंगी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्प, फुगा व खाऊ देऊन तसेच पुस्तक दिन आणि गणवेश वाटपासारखे उपक्रम राबवून नव्या वर्षाची सुरुवात दणक्यात झाली. या प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने शाळेत दाखल झालेल्या नवीन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन आणि टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करण्यात आले. यासोबतच, पुस्तक दिनाचेही आयोजन करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाची पुस्तके वाटप करण्यात आली. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना नवीन गणवेश बूट, मौजे वाटप करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी उत्साह आणि आपुलकीची भावना दिसून आली.



या आनंदोत्सवात भर म्हणून, विद्यार्थ्यांसाठी पोषण आहारात शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोहर कोंडे यांनी मिष्ठान्न वाटप केले. यावेळी आयोजित कार्यक्रमात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला एक वेगळीच शोभा आली आणि शैक्षणिक वर्षाची सुरुवात एका सकारात्मक वातावरणात झाली. नेणवली शाळेने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचे या प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून दाखवून दिले. शाळा भेट अंतर्गत नेणवली शाळेस आज पहिल्या दिनी शिक्षणाधिकारी (योजना) आशा गरुड यांनी भेट देऊन मुलांशी संवाद साधून शालेय माहिती घेतली.

महाराष्ट्र शासनाने चला-शाळेत जाऊया ह्या आव्हानास व शाळा प्रवेशोत्सवास विद्यार्थी पालक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहवर्धक केली.

-राजेंद्र अंबिके, मुख्याध्यापक, रजिप शाळा नेणवली

# नोकरीच्या बहाण्याने अडीच लाखाला गंडा

पनवेल: पोस्ट ऑफिस आणि इन्कम टॅक्स विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका भामट्याने चक्क एका पोलीस अधिकाऱ्याच्या भावाला अडीच लाख रुपयांचा गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे. गणेश वसाराम राठोड असे या भामट्याचे नाव असून कामोठे पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या भामट्याने अशाच पद्धतीने अनेक बेरोजगार तरुणांची फसवणूक केल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# पतीने पत्नीवर तलवारीने केला हल्ला

पनवेल: चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करणाऱ्या पतीने पत्नीवर तलवारीने हल्ला केल्याची घटना उलवे परिसरात घडली. यात महिलेच्या डोक्याला, पायाला दुखापत झाली आहे. उलवे पोलिस ठाण्यात पतीवर गुन्हा दाखल केला आहे. इम्रान खान (वय ३४) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे. यामध्ये तिच्या पायाला दुखापत झाली. पत्नीने अखेर पतीविरोधात पोलिसांकडे तक्रार केली आहे.

# रक्तदाते युवक हिच राष्ट्राची संपत्ती – शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे

पनवेल: राज्यात रक्त न मिळाल्याने अनेकांना जीव गमवावा लागल्याचे पाहिले आहे. मात्र, पनवेल मध्ये अनेक रक्तदाते सामाजिक भान ठेवून कार्यरत आहेत. हे रक्तदाते युवक आपली खरी संपत्ती आहेत,' असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी यांनी केले. कळंबोली येथे रामदास शेवाळे व उपमुख्यमंत्री आरोग्य कक्षाचे प्रमुख मंगेश शेवटी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिर आणि रक्तदाता सन्मान सोहळ्याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.

रक्तदान श्रेष्ठ दान' या उक्तीप्रमाणे जागतिक रक्तदाता दिनाचे औचित्य साधून शिवसेना पनवेल व



रामदास शेवाळे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आणि रक्तदाता सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन विशेष कार्यकारी अधिकारी उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय मंगेश चिवटे यांच्या हस्ते आणि रामदास शेवाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. कळंबोली सह परिसरातील शेकडो युवकांनी या रक्तदान शिबिरात सक्रिय सहभाग घेतला. आयोजकांच्या वतीने प्रत्येक रक्तदात्याचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. मंगेश चिवटे यांनी रक्तदान आणि दात्यांचा गौरव सोहळा कौतुकास्पद असल्याचे सांगितले. पनवेल शिवसेना व रामदास शेवाळे प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराचे कौतुक करत महाराष्ट्राच्या निरोगी आरोग्यासाठी उपमुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता कक्ष अविरत सामाजिक कार्यात सक्रिय राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी कळंबोली शहराध्यक्ष तुकाराम सरक, निलेश दिसले, डीएन मिश्रा, विराट पवार, सुधीर ठोंबरे, सुभाष घाडगे,प्रेम डांगे, आनंदा माने,पंकज सूर्यवंशी, अभिजीत कोरपे, सिद्धेश म्हात्रे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालघर जिल्ह्यात धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा मुख्यमंत्री यांच्या हस्ते शुभारंभ

**पालघर, दि. १६ : प्रतिनिधी**

दिनांक 16 जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा शुभारंभ पालघर जिल्हयात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, कौशल्य विकास रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आदिवासी क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष विवेक पंडित, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, खासदार डॉ. हेमंत सवरा, जिल्ह्यातील आमदार, यांच्या प्रमुख उपस्थितीत मोहिमेचा शुभारंभ करण्यात येत आहे.

दुर्वेश, ता. पालघर, येथील जिल्हा परिषद शाळेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे भेट देणार असून पालक आणि विद्यार्थी यांच्याशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर मनोर येथील मैदानावर आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री धरती आबा जन जातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. आदिवासी विकास विभागा अंतर्गत मोखाडा येथील शासकीय माध्यमिक शाळा, गुहिर ता. वाडा येथील शासकीय माध्यमिक शाळा या नूतन इमारतीचे आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात येणार आहे. रायतळे व आपटाळे ता. जव्हार येथील प्रधानमंत्री जनमन अंतर्गत बहुउद्देशीय केंद्राचे आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात येणार आहे.

अंतर्गत कौशल्य विकास विभाग व रोजगार संबंधी उपक्रम राबविण्याकरिता कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि वाढवण पोर्ट प्रा. लि. यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यात येणार आहे. सवलतीच्या व्याजदरात डायमेकर क्लस्टर साठी जे. एन. पी. ए. (JNPA) आणि युनियन बँक ऑफ इंडिया यांच्या सहकायनि राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेअंतर्गत सवलतीच्या व्याजदरात निधी उपलब्ध करून देणारे निधीपत्र वितरण, वाढवण पोर्ट कौशल्य विकास उपक्रमांतर्गत कस्टम डॉक्युमेंटेशन अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण, जिल्ह्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था



(ITI) मधील प्रशिक्षणार्थींना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) संबंधित प्रशिक्षण देण्याकरिता कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि कॉनफेडरेशन ऑफ इंडिया इंडस्ट्रीज (CII), यांच्या दरम्यान सामंजस्य करार, पालघर जिल्हा अंतर्गत शासकीय आयटीआय मधील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण व रोजगार उपलब्ध करून देण्याकरिता कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग व ब्लू स्टार प्रा. लि. औद्योगिक आस्थापने दरम्यान सामंजस्य करार करण्यात येणार आहे तसेच वसई विरार शहर महापालिका अंतर्गत सर डी एम पेटिट रुग्णालय येथील विस्तारित इमारतीचा आभासी पद्धतीने उद्धाटन, मीरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस आयुक्त परिमंडळ 3, विरार कार्यालय, सहाय्यक पोलीस आयुक्त विरार विभाग कार्यालय, वाहतूक शाखा विरार विभाग कार्यालय, भरोसा सेल वसई विरार कार्यालय, विशेष शाखा वसई विरार कार्यालय, दळणवळण व तंत्रज्ञान विभाग, वसई विरार कार्यालय यांचे आभासी पद्धतीने उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येत आहे.

दि. 16 जुन 2025 रोजी मनोर, ता. पालघर या ठिकाणी होणाऱ्या या महत्वाच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी विविध शासकीय अधिकारी यांच्या समवेत कार्यक्रम स्थळी भेट देवून तसेच बैठक घेऊन आढावा घेतला. या आढावा बैठकीस जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, वसई-विरार महानगरपालिकेचे आयुक्त अनिल पवार, पोलीस अधिक्षक यतीश देशमुख अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी विशाल खत्री, प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी अपूर्वा बसूर, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी महेश सागर ,उपजिल्हाधिकारी रणजित देसाई, सर्व उपविभागीय अधिकारी तहसिलदार बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता, एनएचआयचे प्रकल्प संचालक सुहास चिटणीस तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.


## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

जूना एस.टी. स्टँण्ड, काप आळी, भिवंडी- ४२१३०२, जि. ठाणे, महाराष्ट्र
फोन- ०२५२२-५५३१४/५५३१५, फॅक्स-०२५२२-५२०७४

**बांधकाम विभाग, प्रभाग समिती क्रं. १**
**ई-निवीदा सुचना क्रमांक ३२ सन २०२५/२६**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म दिनांक :- १७ /०६/२०२५ ते दि.:- ०१/०७/२०२५ पर्यंत विक्रीस उपलब्ध आहे.

| अनु. क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदापत्राची किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १ | पोगांव येथील अग्निशमन केंद्राकरीता कंम्पाउंड वॉल बांधणे व गेट बसविणेबाबत. | ४९,९४,७१४/- | २३६०/- |

वरील ऑनलाईन निविदा दि.०१/०७/२०२५ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच सदरची निविदा ही दि.०२/०७/२०२५ रोजी संध्या. ४.०१ अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोई प्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यात येईल. अधिक माहिती महानगरपालिकेच्या mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन प्राप्त होऊ शकेल अथवा नविन शासकीय इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/-
(जमील पटेल)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

जा.क्र./ज.सं.वि./५९७
दि. १६/०६/२०२५


# पहिल्याच पावसात विवळवेढे उड्डाण पुलावर जलतळे
## अपघातात ट्रकचालक गंभीर जखमी

**डहाणू, दि. १६ : प्रतिनिधी**





रविवार, १५ जून रोजी संध्याकाळच्या सुमारास आलेल्या पहिल्याच जोरदार पावसात मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील विवळवेढे (महालक्ष्मी) उड्डाणपुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून रस्त्याला तळयाचे स्वरूप प्राप्त झाले. या पाण्यामुळे महामार्गावरील वाहतूक संथ झाल्याने भरधाव आलेल्या ट्रकने समोर चाललेल्या दुसऱ्या ट्रकला जोरदार धडक दिल्याने गंभीर अपघात घडला. अपघातात धडक देणाऱ्या ट्रकचा चालक गंभीर जखमी झाला असून, त्यास कासा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

महामार्गाचे काँक्रीटीकरण झाल्यानंतर योग्य जलनिचरा आणि पावसाळी नियोजनाचा अभाव असल्याने प्रत्येक पावसात असेच पाणी साचण्याचे प्रकार घडत आहेत. उड्डाणपुलाच्या मध्यभागी साचलेले पाणी हे राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनावर प्रकाश टाकणारे आहे. वाहनधारकांना अपघाताचा धोका आणि वाहतुकीत अडथळा निर्माण होत असूनही प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. घटनेनंतर स्थानिक पोलीस आणि महामार्ग प्रशासनाने घटनास्थळी दाखल होऊन, वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

मात्र, अपघात घडल्यानंतरच प्रशासन जागे होते ही वस्तुस्थिती पुन्हा एकदा समोर आली आहे. महामार्ग प्रशासनाने याआधीच आवश्यक नियोजन करून जलनिचऱ्याची व्यवस्था केली असती, तर अपघात टाळता आला असता. दरवर्षी पावसाळ्यात असे अपघात घडणे ही गंभीर बाब आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून जबाबदारी निश्चित होणे आणि उपाययोजना तातडीने राबवणे आवश्यक आहे.

# वसईतून तडीपार केले असतानाही लुटमारी

**वसई, दि. १६ : प्रतिनिधी**




गुन्हे शाखा दोन वसई युनिटचे पथक गुन्हेगारी वॉच पेट्रोलिंग करत असताना वसई पूर्वेकडील नाईकपाडा येथे दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आलेला सराईत गुन्हेगार हाती लागला. चौकशीत तडीपार असतानाही बेकायदेशीरपणे वसईत राहून लुटमारी करत असल्याचे उजेडात आले आहे. तसेच वालीव पोलीस ठाण्यात दाखल एका लुटमारीच्या गुन्हयातील तो फरार आरोपी असल्याचेही उजेडात आले.

कल्पेश उर्फ कलप्या किसन शिंदे (२४, रा. शिवभीमनगर, नाईकपाडा, वसई पूर्व) असे त्याचे नाव आहे. कल्पेश शिंदेविरोधात वालीव पोलीस ठाण्यात अवघ्या चार वर्षात तब्बल १५ विविध गंभीर गुन्हे दाखल आहेत. लुटमारी आणि मारामारीसारखे गंभीर गुन्हेही कल्पेशविरोधात दाखल असल्याने त्याला २६ मार्च २९२४ पासून पालघर, ठाणे, मुंबई उपनगर जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे.

गुन्हे शाखा दोन वसईचे पथक गुन्हेगारी वॉच पेट्रोलिंग करत असताना शिवभीमनगर, नाईकपाडा परिसरात कल्पेश शिंदे पोलिसांच्या हाती लागला. चौकशीत त्याला दोन वर्षांसाठी तडीपार केले असतानाही तो तडीपारीचा आदेश धुडकावून घरी राहत असल्याचे उजेडात आले. इतकेच नाही तर तडीपार असताना त्याने आपल्या साथिदारासह ३० नोव्हेंबर २४ रोजी एका इसमाला चाकूचा धाक दाखवून लुटले होते. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हयातील तो मुख्य आरोपी असल्याचेही आढळून आले.

पोलीस आयुक्त मधुकर पांडेय, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा दोन वसई युनिटचे पोलीस निरीक्षक समीर अहिरराव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, सागर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक अजित गिते, सहाय्यक फौजदार रमेश भोसले, मुकेश पवार, रविंद्र पवार, प्रफुल्ल पाटील, सचिन पाटील, अविनाश गोवारी, दादा आडके, सुधीर नरळे, राहुल कर्पे, प्रशांतकुमार ठाकूर, अनिल साबळे, प्रतिक गोडगे, राजकुमार गायकवाड यांच्या पथकाने ही कामगिरी केली.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय**
**ठाणे विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**टिएमटि पार्कींग प्लाझा बिल्डींग, आठवा मजला, ज्युपीटर हॉस्पीटल जवळ,**
**सर्व्हीस रोड, ठाणे (पश्चिम), पिन-४०० ६०१.**

| | |
|---|---|
| Website: www.mahapwd.gov.in/Email: elthane.ee@mahapwd.gov.in | दुरध्वनी क्र. ०२२-२५३३३१४४/२५३०४५१४ |
| **जा क्र. काअ/ ठाविवि/निविदा-२/२७६०/ सन २०२५** | **दिनांक : १३/०६/२०२५** |

**निविदा सुचना क्र. ०४ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, ठाणेः विद्युत विभाग, सा. बां. विभाग, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत विद्युत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahapwd.gov.in** (Pay PWD Online) या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तेथुन डाऊनलोड करण्यात यावी. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा. बां. विभाग, ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | ठेकेदारांचा वर्ग/इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क |
|---|---|---|---|
| १ | Est. No. 241110 of 2024-25 Providing Wireman & Majdoor on Contract Basis for Collector Office Palghar, SP office Palghar, Administrative Building A and Administrative Building B in Palghar, District Palghar. | 4,14,336.00 | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.४१५०/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| २ | Est. No.242027 of 2024-25 Providing Renovation to El in Vikramgad Tahsil Office at Vikramgad, Tal- Vikramgad, Dist-Palghar. | 3,98,089.00 | ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.३४००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| ३ | Est. No.142917 of 2025-26 Providing and Installation of Split Type Airconditioning System, Water Pump System at New Govt. VIP Rest House, Jawhar, Tal-Jawhar, Dist-Palghar. | 6,35,118.00 | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.६४००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| ४ | Est. No.142898 of 2025-26 Providing Mini Solar Highmast (4 Nos) at Proposed New Civil Court Campus at Jawhar, Tal-Jawhar, Dist- Palghar. | 8,46,749.00 | ठेकेदाराचा वर्ग- क व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.८५००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| ५ | Est. No.141892 of 2025-26 Providing Solar Street Lights at Village Khardi and Doliv, Tal-Vasai, Dist- Palghar. | 7,69,671.00 | ठेकेदाराचा वर्ग-क व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.७७००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| ६ | Est. No.142891 of 2025-26 Providing Mini Solar Highmast (4Nos) Under Non Conventional Sources of Energy Development Scheme at Karanje, Tal- Wada, Dist- Palghar. | 8,46,749.00 | ठेकेदाराचा वर्ग-क व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.८५००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| ७ | Est. No.142892 of 2025-26 Providing Mini Solar Highmast (4Nos) Under Non Conventional Sources of Energy Development Scheme at Kalepada, Tal- Wada, Dist- Palghar. | 8,46,749.00 | ठेकेदाराचा वर्ग- क व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.८५००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| ८ | Est. No.142893 of 2025-26 Providing Mini Solar Highmast (4Nos) Under Non Conventional Sources of Energy Development Scheme at Thunave, Tal- Wada, Dist- Palghar. | 8,46,749.00 | ठेकेदाराचा वर्ग- क व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.८५००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| ९ | Est. No.142894 of 2025-26 Providing Mini Solar Highmast (4Nos) Under Non Conventional Sources of Energy Development Scheme at Manivali, Tal- Wada, Dist- Palghar. | 8,46,749.00 | ठेकेदाराचा वर्ग- क व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.८५००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| १० | Est. No.142895 of 2025-26 Providing Mini Solar Highmast (4Nos) Under Non Conventional Sources of Energy Development Scheme at Malvi Pada, Tal- Wada, Dist- Palghar. | 8,46,749.00 | ठेकेदाराचा वर्ग- क 'त्र त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.८५००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| ११ | Est. No.142896 of 2025-26 Providing Mini Solar Highmast (4Nos) Under Non Conventional Sources of Energy Development Scheme at Sapne Khurd, Tal-Wada, Dist- Palghar.. | 8,45,749.00 | ठेकेदाराचा वर्ग- क व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.८५००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| १२ | Est. No.142897 of 2025-26 Providing Mini Solar Highmast (4Nos) Under Non Conventional Sources of Energy Development Scheme at Sapne Bu., Tal- Wada, Dist- Palghar. | 8,46,749.00 | ठेकेदाराचा वर्ग- क व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु.८५००/- निविदा शुल्क रु.५९०/- (जीएसटीसह) |
| १३ | Est. No. 141826 of 2024-25 Providing and Installing Fire Fighting System in Vasai Krutrim Retan Buliding at Vasai, Tal- Vasai, Dist-Palghar. (2nd Call) | 8,74,005.00 | अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असलेले विद्युत अनुज्ञाप्ती व. अग्निशमन अनुज्ञाप्ती धारक ठेकेदार. इसारा रक्कम रु.८७५०/- निविदा शुल्क रु.५९०/-(जीएसटीसहं) |

**निविदा उपलब्ध कालावधीः दिनांक २०.०६.२०२५ रोजी सकाळी १०.०० पासून ते दि.०४.०७.२०२५ रोजी संध्याकाळी ०६.०० पर्यंत.**
**निविदा उघडणेः दिनांक ०८.०७.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता.**
**निविदा उपलब्ध कालावधीः दिनांक २०.०६.२०२५ रोजी सकाळी १०.०० पासून ते दि. २७.०६.२०२५ रोजी संध्याकाळी ०६.०० पर्यंत. (अ.क्र.१३ करीता)**
**निविदा उघडणेः दिनांक ०१.०७.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता. (अ.क्र.१३ करीता)**
१. **https://mahapwd.gov.in** (Pay PWD Online) या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
(सदर निविदा सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वर कळविण्यात येईल)
२. कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, ठाणे, कार्यालयातील सुचना फलक.

सही/-
(मानसिंगराव रं. शिंदे)
कार्यकारी अभियंता (विद्युत)
ठाणे विद्युत विभाग. सा. बां. विभाग, ठाणे

विमाका/कोवि/२०२५-२०२६/६२


# वडवली-कवाडा रस्त्याचे काम रखडले
## खड्ड्यांमुळे गावकरी त्रस्त, आंदोलनाचा इशारा






**तलासरी, दि. १६ : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग (NH-8) ते वडवली-सवने रस्त्याच्या सुधारणा कामाला 19 डिसेंबर 2024 रोजी सुरुवात झाली. एकूण 6.770 कि.मी. लांबीच्या या रस्त्यासाठी 776.72 लाख रुपये इतकी अंदाजित रक्कम मंजूर करण्यात आली असून, हे काम शिवसाई कन्स्ट्रक्शन, पालघर या ठेकेदाराकडे आहे. देखरेख महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, पालघर येथील कार्यकारी अभियंता करीत आहेत. मात्र, काम सुरू होऊन पाच ते सहा महिने उलटून गेले तरी देखील रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने आणि दुर्लक्ष झाल्यासारखेच सुरू आहे. रस्त्याची दुरवस्था झाली असून कामही रखडल्याने गावकऱ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

> या रस्त्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे. जर लवकरात लवकर डांबरीकरण व दर्जेदार रस्ता तयार झाला नाही, तर काँग्रेस रस्त्यावर उतरून आंदोलन करील.
>
> **- गौतम धनारे , अध्यक्ष, काँग्रेस तलासरी तालुका**
>
> रस्ता तयार न झाल्याने यंदाही शाळाकरी मुलांना ये-जा करण्यासाठी पावसाळ्यात खूप त्रास सहन करावा लागणार आहे. हॉस्पिटल, बाजारपेठ, शाळा, कॉलेज गाठण्यास आमच्या लोकांना जीवमुठीत धरुन प्रवास करावा लागतो. आमच्यासाठी रस्ता म्हणजेच जीवनवाहिनी आहे.
>
> **- सुरेश सेदळ, ग्रामस्थ (वंकास)**

19 डिसेंबर 24 पासून कामाला सुरुवात झाली असून एका वर्षात काम पूर्ण करावयाचे आहे. पण, सहा महिने होत आले असतानाही अद्याप रस्त्याच्या मुख्य पृष्ठभागाचे डांबरीकरण व समतलीकरण झालेले नाही. प्रशासनाच्या माहितीनुसार 23 मोऱ्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. परंतु रस्त्याची एकूण अवस्था धोकादायक व रहदारीला अयोग्यच आहे. परिणामी वडवली, सवने, वंकास, कवाडा या गावांसह त्यातील एकूण 20 हून अधिक पाड्यांमधील नागरिक दररोज मोठ्या त्रासाला सामोरे जात आहेत.

या भागातील गावांसाठी तलासरी येथे मुख्य बाजारपेठ, आरोग्यसेवा केंद्र आणि शिक्षण संस्था आहे. वडवली गावात ८, कवाडा येथे ६ आणि सवणे गावात ५–६ पाडे असून, येथून तलासरी गाठणे अत्यावश्यक आहे. मात्र, अपूर्ण व खड्ड्यांनी भरलेल्या रस्त्यावरून दुचाकी, रिक्षा किंवा चारचाकीने प्रवास करणे म्हणजे तारेवरची कसरत करावी लागते. गरोदर महिलांना प्रसूतीसाठी रुग्णालयात पोचवताना प्रचंड अडचणी येतात. वेळेवर उपचार न मिळाल्यास जीवितहानीची शक्यता नाकारता येत नाही. वृद्ध नागरिक व दीर्घ आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी देखील हा रस्ता यंत्रणेसारखा अडथळा ठरत आहे

या मार्गावरून शेकडो विद्यार्थी दररोज शाळा, कॉलेज गाठतात. दहावीनंतरचे शिक्षण तलासरीमध्येच मिळत असल्याने त्यांना रोज याच रस्त्यावरून ये-जा करावी लागते. खड्ड्यांमुळे अनेकवेळा विद्यार्थ्यांचा अपघात होतो, काहीजण जखमी होतात. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यही धोक्यात येत आहे. रस्त्यावर खड्डे इतके आहेत की वाहन चालवणे हे धाडसाचे काम वाटते. अनेकवेळा दुचाकीस्वार पडतात, रिक्षा पलटी होते, चारचाकी वाहनांना नुकसान होते. त्यामुळे चालकवर्गही या मार्गावरून प्रवास करणे टाळू लागला आहे. परिणामी रुग्ण वाहतूक किंवा शेतीमाल वाहतूक देखील अडचणीत आली आहे.

# रॉयल कॉलेज ऑफ आर्टच्या पदवीधर सोनाक्षी प्रस्तुत करतात जात

## धातू आणि स्मृतीद्वारे स्त्रियांच्या दडपलेल्या इतिहासांचा शोध घेणारे शिल्प प्रदर्शन

**नवी दिल्ली, १६ जून :** ब्रिटिश काउन्सिलच्या कस्तुरबा गांधी मार्गावरील द गॅलरीमध्ये, स्टडी यूके : क्रिएटिव्ह कनेक्शन्स या उपक्रमांतर्गत जात या शिल्प प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन ११ जून ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत खुले राहील. लंडनस्थित भारतीय कलाकार सोनाक्षी यांनी सादर केलेली ही कलाकृती धातू, वारसा आणि अर्थ यांच्या माध्यमातून मातृवंशीय स्मृतींचा शोध घेते.

आग्रा येथे जन्मलेल्या आणि सध्या लंडनमध्ये वास्तव्यास असलेल्या





सोनाक्षी चतुर्वेदी यांनी चित्रकला, इनॅमलिंग (धातूवरील सजावटीची प्रक्रिया) आणि रत्नविद्या यांचा वापर करत स्त्रियांच्या इतिहासाची जाणीवपूर्वक पुसली गेलेली पाने समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रदर्शनात वधू, आई आणि आजी या पारंपरिक भूमिकांना आव्हान देण्यात आले असून, भारतीय उपखंडातील हस्तकला परंपरांमध्ये लपलेल्या स्त्रियांच्या न सांगितलेल्या इच्छा आणि आठवणी यांना केंद्रस्थानी आणले आहे.

# अझीम प्रेमजी फाउंडेशन कडून हेल्थ इक्विटी फेलोशिप जाहीर

**नागपूर, १६ जून :** अझीम प्रेमजी फाउंडेशनने अझीम प्रेमजी हेल्थ इक्विटी फेलोशिप जाहीर केली आहे. ही फेलोशिप १८ महिन्यांची असून, पदव्युत्तर डॉक्टरांसाठी एक सखोल आणि प्रत्यक्ष अनुभव देणारी शिकण्याची मोठी संधी आहे. ही फेलोशिप अझीम प्रेमजी फाउंडेशन आणि देशभरातील ११ प्रतिष्ठित आरोग्य संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून राबवली जात आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत फेलोशिपधारकांना ग्रामीण भागातील रुग्णांसोबत प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळणार आहे. विविध रुग्णप्रकारांच्या हाताळणीचा सराव आणि वरिष्ठ डॉक्टरांकडून मार्गदर्शन यामुळे फेलोजना प्रभावी क्लिनिकल कौशल्ये आणि समुदायातील आरोग्यविषयक अनुभव मिळणार आहे.

ही फेलोशिप स्वीकारल्यास फेलोजना आरोग्यसेवेच्या आघाडीच्या पातळीवर प्रत्यक्ष कामाचा मौल्यवान अनुभव मिळणार आहे. आरोग्य क्षेत्रातील विषमतेची कारणे आणि अडथळे समजून घेण्याची संधी या फेलोशिपमुळे मिळेल. अनुभवी तज्ज्ञ आणि स्थानिक समुदायासोबत मिळून परिणामकारक उपाययोजना राबवण्याची संधीही मिळू शकते. शिवाय आरोग्य क्षेत्रात दीर्घकालीन बदल घडवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या तत्पर व्यक्तींच्या नेटवर्कचा भाग होण्याची संधीही साधता येणार आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिन: सोनी सबच्या कलाकारांनी अनुभव सागितले.. योगामुळे कसे फिट राहतात आणि दिवसाची सकारात्मक सुरुवात कशी करतात..

**मुंबई, १६ जून :** योग ही केवळ एक सराव पद्धत नाही, तर ती एक विश्रांती आहे, पुन्हा नव्याने सुरुवात करण्याची संधी आहे आणि स्वतःशी पुन्हा कनेक्ट होण्याची एक नाजूक आठवण आहे. जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होत असताना, सोनी सब वाहिनीवरील लोकप्रिय कलाकार - प्रियंवदा कांत, आशी सिंग आणि सायली साळुंखे -यांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात लहान योग सरावांमुळे किती मोठे बदल झाले आहेत यावर अनुभव शेअर केले. हळूवार श्वासोच्छ्वासापासून ते माइंडफुल हालचालींपर्यंत, शूटिंगपूर्वी रिचार्ज होण्यास आणि फिट राहण्यास योगाची त्यांना कशी मदत होते याबद्दल त्यांनी सांगितले.

'तेनाली रामा' मालिकेत शारदाची भूमिका करणारी प्रियंवदा कांत म्हणाली, मी माझ्या दिवसाची सुरुवात सूर्य नमस्काराने करते. ही खूप साधी सोपी गोष्ट आहे. पण तुम्हाला किती खोलवर स्थिरता देते हे आश्चर्यकारक आहे. शारदा अशी व्यक्ती आहे जी साध्या गोष्टीतही आशा शोधते आणि मला वाटते की योग देखील तेच करतो. योगाद्वारे शरीर ताणत नाही तर तुमच्या कक्षा रुंदावतात. स्वतःसोबतचा तो शांत वेळ, जरी तो काही मिनिटांचा असला तरी, तुमचा बाकीचा दिवस कसा जातो हे पूर्णपणे बदलू शकतो. खूप वेगाने धावणाऱ्या या जगात, हे काही माइंडफुल श्वास मला हळूवार होण्यास आणि माझ्या शरीराचे, माझ्या विचारांचे आणि कधीकधी शांतता ऐकण्याची आठवण करून देतात.

'उफ्फ... ये लव्ह है मुश्किल' मध्ये कायरी शर्माच्या भूमिकेसाठी ओळखली जाणारी आशी सिंग, म्हणाली, योग माझ्यासाठी एक शांततेचा आधार बनला आहे. सेटवर जाण्यापूर्वी फक्त दहा मिनिटे श्वासोच्छ्वास किंवा काही स्ट्रेचेस केले तरी, मला ते खूप फरक जाणवतो. एक शांतता येते, जणू काही दिवस सुरू होण्यापूर्वीच मी स्थिर झाले आहे. हे काही परिपूर्णतेसाठी नाहीये. तर लहान आणि चिरंतन मार्गाने स्वत:साठी वेळ देण्याची बाब आहे. कालांतराने, ते छोटे क्षण खूप महत्त्वाचे वाटू लागतात. आणि थोड्या वेळाने, ते छोटे क्षण खूप मोठा फरक करतात. व्यस्त किंवा तणावपूर्ण दिवसांमध्ये, स्वतःसोबतचा तो थोडा वेळ मला धीमे होण्यास आणि श्वास घेण्याची आठवण करून देतो. हे खूप सोपे आहे पण त्याचवेळी खूप उपयुक्त आहेत.

'वीर हनुमान' मध्ये माता अंजनीची भूमिका साकारणारी सायली साळुंखे म्हणाली, माझ्यासाठी योग म्हणजे केवळ आसनांची मालिका नाही – तो स्वतःशी केलेला एक भावनिक संवाद आहे. इथेच मी धीमे व्हायला, खोलवर श्वास घ्यायला आणि माझ्या आतल्या शांत शक्तीला ऐकायला शिकते. काही मिनिटांचा माइंडफुल श्वास किंवा हलका स्ट्रेच देखील तुमचा संपूर्ण दिवस बदलू शकतो, अशी मला खात्री आहे. योगाने मला संतुलन शिकवले आहे, केवळ चटईवरच नाही तर प्रत्येक भावना आणि मी समोर येणाऱ्या प्रत्येक आव्हानात. या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, मी प्रत्येकाला, विशेषतः तरुण पिढीला आवाहन करते की योगाला केवळ एक ट्रेंड म्हणून नव्हे तर एक आयुष्यभराचा जोडीदार म्हणून स्वीकारा. तुम्हाला परिपूर्ण असण्याची गरज नाही, तुम्हाला फक्त सुरुवात करायची आहे. जिथे आहात तिथून, जे तुमच्याकडे आहे त्यापासून सुरुवात करा आणि योगाला तुम्हाला स्वतःच्या घरी घेऊन जाऊ द्या.

# झी टीव्हीवरील भाग्य लक्ष्मीच्या शेवटाची तयारी पण #RishMi जादू नेहमीच टिकून राहील!



**मुंबई, १६ जून :** झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका भाग्य लक्ष्मी, जी गेल्या सुमारे ४ वर्षांपासून आपल्या हृदयस्पर्शी कथानक आणि लक्षात राहणाऱ्या पात्रांमुळे प्रेक्षकांचे मन जिंकत होती, आता समाप्त होण्याच्या मार्गावर आहे. १३५० हून अधिक भागांसह या मालिकेने देशभरातील लाखो लोकांच्या मनात कायमचे स्थान मिळवले. नशीब, स्थैर्य आणि प्रेम या संकल्पनांभोवती गुंफलेली ही कथा तिच्या भावनिक सादरीकरणासाठी ओळखली गेली, आणि आता ऋषी आणि लक्ष्मी यांच्या चढ-उतारांनी भरलेल्या प्रवासाचा शेवट होणार आहे.

मालिका शेवटाकडे वाटचाल करत असताना, प्रेक्षकही एक सुखद शेवट पाहण्याची अपेक्षा करत आहेत, जिथे लक्ष्मी (ऐश्वर्या खरे) आणि ऋषी (रोहित सुचांती) हे त्यांच्या नात्यामधील अनेक परीक्षांवर मात करून एकत्र येतील. नुकतेच मालिकेचे चित्रीकरण पूर्ण झाले असून, कलाकार आणि क्रू सदस्यांनी एकत्र येऊन या विलक्षण प्रवासाचा आनंदोत्सव साजरा केला. सेटवर यावेळी अनेक भावुक क्षण पाहायला मिळाले. विशेष केक कापण्यात आला, हसरे चेहरे, अश्रू, आलिंगने आणि आठवणींचा साज चढला. भाग्य लक्ष्मीला साकारणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमधील आपुलकी आणि कौटुंबिक भावना या सोहळ्यात स्पष्ट दिसून आली.

या प्रवासाबद्दल ऐश्वर्या खरे म्हणाली, गेल्या ४ वर्षांत मी लक्ष्मीच्या आनंदात, दुःखात, तिच्या श्रद्धेच्या क्षणांमध्ये तिच्यासोबत जगले आहे. हे पात्र माझ्यासाठी फक्त एक भूमिका नव्हती, तर माझ्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग झाली होती. तिच्यापासून दूर जाणे म्हणजे माझ्या एका भागापासून दूर जाणे. प्रेक्षकांनी पहिल्या दिवसापासून आम्हाला भरभरून प्रेम दिले आणि लक्ष्मीच्या प्रवासाला स्वीकारले, यासाठी मी सदैव ऋणी राहीन. या मालिकेने मला एक व्यासपीठच नव्हे तर मैत्री, कुटुंब आणि अमूल्य आठवणी दिल्या आहेत. आमच्या दिग्दर्शकांपासून ते स्पॉट दादांपर्यंत, प्रत्येकाने भाग्य लक्ष्मीला या उंचीवर पोहोचवण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. रोहित हा एक अप्रतिम सह-कलाकार आहे आणि स्मिता मॅडम, अमन, मुनिरा, पारुल मॅडम, मेघा प्रत्येकाने काहीतरी खास दिले. या प्रवासाने माझे आयुष्य बदलून टाकले आणि मी यासाठी सदैव कृतज्ञ आहे.

रोहित सुचांति पुढे म्हणाला, ऋषी ओबेरॉय हे पात्र माझ्या कारकीर्दीतील एक खास पात्र राहिल. या मालिकेने मला ओळख दिली आणि प्रेक्षकांशी जोडून ठेवलं, यासाठी मी कायम आभारी राहीन. ही फक्त एक मालिका नव्हती, तर एक भावना होती, जिच्या कथेशी लोक सहज जोडले गेले. कोणत्याही मालिकेचा शेवट सोपा नसतो, विशेषतः जेव्हा तो घरासारखी भावना देतो. पण आम्ही एक टीम म्हणून जे तयार केले त्याचा मला अभिमान आहे. आम्ही इथे ऑन-स्क्रीन आणि ऑफ-स्क्रीन जी नाती निर्माण केली, ती आयुष्यभर टिकतील. भाग्य लक्ष्मीने मला आठवणी, मार्गदर्शक, हास्य आणि विकासाची संधी दिली आणि मी हे सर्व पुढच्या आयुष्यात माझ्यासोबत घेऊन चालणार आहे.

भाग्य लक्ष्मी आता निरोप घेत आहे, आणि ती प्रेम, त्याग आणि कठीण काळात नशिबावर विश्वास ठेवण्याचा संदेश मागे सोडून जात आहे. ही फक्त एक मालिका नव्हती, तर ती तिच्यात सामील असलेल्या प्रत्येकासाठी एक हृदयस्पर्शी अनुभव होता.

### सावंगी रुग्णालयात प्रथमच दुर्बिणीद्वारे अस्थिशल्यचिकित्सा

# मणक्यांच्या उपचारात क्रांती घडविणारी स्पाइन सर्जरी



**वर्धा, १६ जून :** मणक्याच्या उपचारांमध्ये क्रांती घडवून आणणारी एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील अस्थिरोग विभागात प्रथमच करण्यात आली. मणक्यांच्या शस्त्रक्रिया या जोखीमेच्या आणि वेदनादायी असून नव्याने एंडोस्कोपिक म्हणजेच दुर्बिणीद्वारे केल्या जाणाऱ्या या प्रगत शस्त्रक्रियेमुळे रुग्णांना सावंगी रुग्णालयात अद्यावत सेवा उपलब्ध झाली आहे.

सावंगी मेघे रुग्णालयात पहिली एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी समुद्रपूर येथील रहिवासी असलेल्या ४८ वर्षीय स्त्रीरुग्णावर करण्यात आली. या महिलेला बऱ्याच दिवसांपासून कंबरदुखीचा त्रास सुरू होता. तिच्या दोन्ही पायांना कंबरेपासून तळपायापर्यंत मुंग्या आल्याची जाणीव होऊन पाय बधिर होत असल्याने चालणे अशक्यप्राय झाले होते. या त्रासामुळे घरातील दैनंदिन कामावरही त्याचा विपरीत परिणाम होऊ लागला. रुग्णाला वेगवेगळ्या खाजगी दवाखान्यात दाखविण्यात आले, मात्र तात्पुरता आराम होऊन पुन्हा त्रास सुरू होत असे. दरम्यान सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील अस्थिरोग विभागात दाखवण्याचा सल्ला परिचितांकडून मिळाल्याने तिला सावंगी येथे आणण्यात आले.

सावंगी रुग्णालयात स्पाइन सर्जन डॉ. समीर तायडे यांनी तपासणी केली असता रुग्णाला स्पायनल स्टेनोसिस नावाचा आजार असल्याचे निदान झाले. या आजारावर शस्त्रक्रियेशिवाय दुसरा पर्याय नसल्याचे रुग्ण व नातेवाईकांच्या संमतीने एंडोस्कोपिक स्पायनल डीकंप्रेशन सर्जरी करण्याचा निर्णय घेण्यात आला. रुग्णाच्या शरीरावर अत्यंत लहान चिरा मारून त्यामार्गाने एंडोस्कोप आत टाकला जातो आणि अंतर्गत तपासणी व उपचार केले जातात. या प्रक्रियेत रुग्णाला मोठी जखम होत नसून वेदनाही कमी होतात. तसेच जंतूसंसर्ग होण्याचा धोका यात कमी असून कमी वेळेत रुग्ण बरा होऊन पूर्ववत आपली दैनंदिन कामे करू लागतो. ज्येष्ठ अस्थिशल्यचिकित्सक डॉ. गजानन पिसूळकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. समीर तायडे यांनी ही पहिली एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी पूर्णत्वाला नेली. शस्त्रक्रियेनंतर या रुग्णाला चार दिवसातच सुट्टी देण्यात आली आणि ती सध्या पूर्वीप्रमाणे घरातील व शेतीतील कामे करीत आहे, असे डॉ. तायडे यांनी सांगितले.

हर्निएटेड डिस्क, स्पाइनल स्टेनोसिस आणि इतर मणक्याशी संबंधित समस्यांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना आता सावंगी मेघे रुग्णालयात हा आजच्या काळातील सर्वात प्रगत उपचार उपलब्ध झाला आहे. कमी त्रास आणि अधिक कुशल उपचारांमुळे अस्थिशल्यचिकित्सा क्षेत्र एक प्रगत व विश्वसनीय पाऊल सावंगी रुग्णालयाने टाकले आहे, अशी प्रतिक्रिया डॉ. पिसूळकर यांनी व्यक्त केली.

# 'जलसंधारण' प्रत्येकाचे कर्तव्य!



भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल असा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी पाऊस लवकर येईल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरताना दिसत आहे. ७ जूनला महाराष्ट्रात दाखल होणारा मान्सून यावर्षी २५ मे रोजीच दाखल झाला आहे. पाऊस लवकर आल्याने बळीराजाची चिंता दूर झाली आहे. पाऊस लांबला की पेरण्या लांबतात आणि पेरण्या लांबल्या की बळीराजाचे पुढील सर्व नियोजन कोलमडते. सुदैवाने राज्यात वेळेवर पाऊस सुरू झाल्याने राज्यातील अनेक भागात होणारी पाणीटंचाई मिटली आहे. सध्या राज्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली आहे. विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातही दमदार पाऊस कोसळत आहे. मान्सूनपूर्व पावसानेही राज्यात चांगलाच धुमाकूळ घातला होता. आताही राज्यात दमदार पाऊस पडत आहे. राज्यात दमदार पाऊस पडत असल्याने धरणातील पाणी साठाही वाढत आहे. उजनी सारखे मोठे धरण आताच ४० टक्के भरले आहे. राज्यातील सर्व नद्या,नाले, तलाव, ओढे ओसंडून वाहत आहेत. वरुण राजाने यावेळी चांगलीच कृपा केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. धरणीमाईही चिंब भिजून हिरवा शालू पांघरत आहे. गेल्या काही वर्षात राज्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. पाण्यासाठी दाही दिशा.... अशी लोकांची अवस्था झाली होती. सुदैवाने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होणार असल्याने पाणी टंचाई मिटली आहे असे असले तरी पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. यावर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि वापर करावा लागणार आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणार असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. पावसाच्या जास्तीतजास्त पाण्याची बचत कशी होईल याचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे बरेचसे पाणी वाया जाते. कमी पाऊस पडणाऱ्या भागात तर हा पाण्याचा अपव्यय होय. महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी जिरवणे आणि पाणी साठवणे या दोन तंत्राची खूप जरुरी आहे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा असा की भूगर्भातील पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व त्यात घट होत नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ धरणे बांधून, पाईपलाईन शहरापर्यंत नेऊन घरोघरी पाणी पोहचवणे असा नाही.

जलव्यवस्थापन याचा अर्थ समाज व पाणी यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व पटवून देणे. पावसाचे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे याचे शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला हवे. यासंदर्भात नागरिकांचेही प्रबोधन व्हायला हवे. नदी, विहीर, तलाव, बंधारे यात पावसाचे जास्तीतजास्त पाणी कसे साठेल याचे नियोजन सरकारी पातळीवर व्हायला हवे. नागरिकांनी आपल्या घरात, सोसायटीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयातही रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. पावसाच्या पाण्याची साठवणूक म्हणजे पर्जन्य जलसंधारण प्रत्येक घरात, सोसायटीत, कार्यालयात झाले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पाण्याचा थेंब न थेंब महत्वाचा आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे कारण ती काळाची गरज आहे. भविष्यात दुष्काळ पडू नये असे वाटत असेल तर पर्जन्य जलसंधारण करावेच लागेल.

* * *

# शाकाहारी मांसाहारी पदार्थात वेगळी प्रक्रिया

**मुंबई, १६ जून :** हॉटेल रेस्टॉरंट मध्ये यापुढे शाकाहारी मांसाहारी पदार्थांची संपूर्ण प्रक्रिया वेगळी असणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार पदार्थावर प्रक्रिया, शिजवणे वेगवेगळ्या पद्धतीत करावे, अन्यथा व्यावसायिकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सूचक इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिला आहे.

शाकाहारी अन्नपदार्थांची मांसाहारी अन्न पदार्थांपासून प्रक्रियात्मक व साठवणीच्या टप्प्यावर स्पष्टपणे वेगळी व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या अन्न सुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या अन्न व्यावसायिकांवर परवाना रद्द, दंड आकारणे किंवा कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिला आहे. सर्व अन्न व्यवसायिकांनी अन्न सुरक्षेबाबत असलेल्या नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे. अन्न व औषध प्रशासनामार्फत गतवर्षी राज्यातील ३० हजार अन्न व्यवसायिकांना अन्न सुरक्षेबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. तर या वर्षी एक लाख अन्न व्यवसायिकांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अन्न सुरक्षा ही केवळ कायदेशीर बाब नसून ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे. नियमांच्या पालनात दोषी अन्न आस्थापनाना त्वरित नोटीस, कारवाई व आवश्यक ती कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**... तर येथे तक्रार करा!**

अन्न भेसळीसंदर्भात नागरिकांनीही हेल्पलाइन किंवा फूड सेफ्टी कॉंटेक्ट ॲप च्या माध्यमातून तक्रार नोंदवावी. अधिक माहितीसाठी किंवा मार्गदर्शनासाठी आपले नजीकचे अन्न व औषध प्रशासन कार्यालय किंवा https://fda.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी, असेही आयुक्त नार्वेकर यांनी सांगितले.

## आज का अंदाज

मंगळवार १७ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ५ | ६ | ० | २ | ४ | ७ | ८ |
| १२० | ११३ | १२३ | १३६ | ११० | १३० | ११५ | १२५ |
| २५६ | २५८ | २२२ | ३८९ | २०० | ४५५ | २५० | ३५० |
| ३४६ | ३५७ | ३३० | ४६० | ५७० | ५३६ | ३४० | ४५९ |
| ३१ | ५२ | ६२ | ०३ | २१ | ४२ | ७१ | ८१ |
| ३२ | ५३ | ६४ | ०४ | २४ | ४३ | ७३ | ८४ |
| ३९ | ५८ | ६८ | ०८ | २८ | ४८ | ७८ | ८७ |

**१७ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | ३१ | ५३ | ६३ |
| १४ | ३६ | ५४ | ६५ |
| १७ | ३७ | ५७ | ६७ |

## राशीभविष्य

**मेष :** आज तुमच्या स्वप्नांच्या दिशेने मोठे पाऊल टाकण्यासाठी तयार व्हा. तुमच्या ध्येयांवर लक्ष केंद्रित करा. फिट आणि निरोगी शरीर ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करणे गरजेचे आहे.

**वृषभ :** आज आर्थिकदृष्ट्या काही नवीन जबाबदाजया मिळू शकतात, ज्या तुम्हाला काळजीपूर्वक हाताळाव्या लागतील. आज कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार करताना अत्यंत सतर्क राहा.

**मिथुन :** खर्च करताना थोडी सावधगिरी बाळगा. अनावश्यक खर्च टाळा. जास्त ताण घेणे टाळा. कारण याचा तुमच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. जोडीदाराच्या यशामुळे मन प्रसन्न राहील.

**कर्क :** तुमचा आहार निरोगी आणि संतुलित ठेवा. तुमच्या भावना जोडीदारासोबत शेअर करा. यामुळे तुमच्यात गैरसमज निर्माण होणार नाहीत. नाते अधिक मजबूत होईल.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला राहील. आरोग्य संबंधित समस्यांपासून सुटका मिळेल. व्यायाम आणि आहारावर लक्ष द्या. जमीन-जुमल्याच्या जुन्या खटल्याचा निकाल तुमच्या बाजूने लागेल.

**कन्या :** तुमच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्या. कोणतीही समस्या असल्यास लगेच डॉक्टरांना भेटा. तुमच्या प्रेमसंबंधात काही चढ-उतार दिसून येतील, त्यामुळे संयम ठेवा. एकमेकांना समजून घ्या.

**तुळ :** ज्वेलरी व्यवसायिकांना नेहमीपेक्षा जास्त फायदा होईल. तुम्हाला कामात मदत मिळाल्याने आराम वाटेल. काही लोक तुमच्याकडून मदतीची अपेक्षा ठेवतील. तुम्ही ती पूर्ण कराल.

**वृश्चिक :** आजचा तुमचा दिवस कार्यक्षेत्रात प्रगती घडवणारा असेल. तुमची सर्व थांबलेली कामे आज पूर्ण होऊ शकतात. आज तुम्हाला विवाहाचा प्रस्ताव देखील येऊ शकतो.


**धनु :** आज तुमच्या जीवनात थोडेफार बदल जाणवतील. तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळू शकते. ज्यामुळे तुमचा दिवस आनंददायी होईल. तुमची आर्थिक स्थिती चांगली राहिल.

**मकर :** सकारात्मक विचारांमुळे बॉस तुम्हाला एखादी उपयुक्त वस्तू भेट देऊ शकतो. तुमचे दांपत्य जीवन आनंदी राहील. आरोग्य चांगले राहील. आज नात्यात गोडवा वाढवण्याचा दिवस आहे.

**कुंभ :** आजचा दिवस आई-वडिलांच्या सेवेत जाईल. एखादी चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. संध्याकाळी मुलांसोबत चांगला वेळ जाईल. राजकारणाशी संबंधित लोकांना आज मोठे पद मिळेल,

**मीन :** नवीन जमिनीसंबंधित व्यवहार करणार असाल, तर आधी नीट चौकशी करा. जे तरुण आज नोकरीच्या शोधात आहेत, त्यांना आज चांगली नोकरी मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला राहील.

# शब्दकोडे क्रमांक २१३९



**आडवे शब्द :-**

१) असंभवनीय असा मोठा लाभ
५) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
९) आगबोट
११) आमरसाची पोळी
१२) तृण
१४) हिंदीत दु:ख
१५) धुणे
१७) एक भटकी जमात
१९) क्षुल्लक, नीच, तेजोहीन
२२) सिंह
२३) जुगाराचा एक प्रकार
२४) लोकसभा
२५) सळई, काडी, खुंटी
२६) फसव्या, धूर्त मनुष्य
२७) कुंभाराची भट्टी
२८) बोबडी वळाल्यानंतरची भाषा
३०) रथ हाकणारा
३१) एखाद्याच्या वतीने घातलेली भीड
३४) पौराणिक अश्ववाहन
३५) सबब
३७) प्रथम पुजेचा मान असलेला देव
३८) ओलसर हवा
४१) निवासस्थान
४२) पाठविलेला
४४) नजरेचा तीर
४६) अनाथच्या विरुद्ध
४७) तोंडातोंडी झालेला व्यवहार
५२) देवापाशी मागितलेला निर्णय
५३) टरफल
५४) शृंगारिक लावण्या म्हणणारा
५६) धमनी
५७) ज्वारी/बाजरीचा एक पदार्थ
५८) नकला करणारा
६०) पळून जाणे
६२) एक सुगंधी वनस्पती
६४) गव्हाचे जाडसर पीठ
६५) जास्तीत जास्त
६७) पालव
७१) सहस्त्र
७२) मानवी कत्तल
७४) तोंडी वचन किंवा करार
७५) दरोडा
७६) ज्ञाति
७७) युवती

**उभे शब्द :-**

१) अशा प्रकारचा
२) भीतीने थरथर कापणे
३) संसर्ग, पिशाचबाधा
४) संसार, जन्म, उत्पत्ती
६) रत्नाकर
७) कालपुरुष
८) ताठा, गर्व
९) जन्म-मृत्यू
१०) प्रत्येक जन्मांत
१३) शोध, माग
१६) बारीक, मऊ केस
१८) केशवृद्धिची सुगंधी वनस्पती
२०) सहाय्य
२१) शोक, दु:ख
२३) संन्यासी, बैरागी यांचे राहण्याचे ठिकाण
२४) संभाषण
२५) आण, भाक, वचन
२७) पत, अब्रू, नाव
२९) पोत्याचे कापड
३०) उंट हाकणारा
३२) श्रीरामाचे जनकजननी
३३) उंट, हत्ती यांची विष्ठा
३६) मोठा , महान
३७) हरविलेले सापडणे
३९) वर्षाचा बारावा महिना
४०) आई
४१) मोठा जाड हातोडा
४३) होडी
४५) घोडेस्वार
४८) प्रकाशणे, लकलकणे
४९) व्रत
५०) हालचाल
५१) उत्तेजन, आश्वासन
५४) विद्या
५५) चकाकी, तजेला, तेज
५६) मुस्लीम सरदार
५७) हमाल
५९) मणका
६१) हात
६२) एक श्वासरोग
६३) न्याय
६५) कडक, पांढुरका रंग
६६) एक ऋतू
६७) पुन्हा
६८) सुंदर युवती, स्त्री
६९) एक चतुर्थांश भाग
७०) झकास
७२) काढलेली सुट्टी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# पावसात वीज यंत्रणेपासून सतर्क राहण्याचे महावितरणचे आवाहन

**पालघर/ठाणे, दि. १६ : प्रतिनिधी**

वादळी व संततधार पाऊस किंवा अतिवृष्टी, पूर परिस्थिती, झाडे व फांद्या कोसळल्याने तुटलेल्या वीजतारा, विजेची उपकरणे किंवा यंत्रणेमधील शॉर्टसर्कीट आदींमुळे वीज अपघाताची शक्यता असते. या पार्श्वभूमिवर नागरिकांनी सार्वजनिक व घरगुती वीजयंत्रणा, उपकरणांपासून सतर्क राहावे. तसेच पूर किंवा अतिवृष्टीमुळे कोणत्याही क्षणी प्रतिकूल स्थिती, धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्रांचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात येतो. अशा स्थितीत वीज ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. कल्याण परिमंडलांतर्गत सर्वच मंडल कार्यालयांमध्ये चोवीस तास नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. तर आपत्कालीन परिस्थितीत साधनसामग्री व मनुष्यबळासह सज्ज राहण्याचे निर्देश मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी दिले आहेत.

अतिवृष्टी, वादळी पाऊस आदींमुळे तुटलेल्या वीजतारा, वीजखांब, रस्त्याच्या बाजूचे फिडर पिलर, रोहित्रांचे लोखंडी कुंपण, फ्यूज बॉक्स तसेच घरातील ओलसर विद्युत उपकरणे, शेतीपंपाचा स्वीचबोर्ड, विद्युत यंत्रणेजवळील इतर ओलसर वस्तु, साहित्य आदींमुळे विद्युत अपघात होण्याची शक्यता असते. पाणी हे विजेचे वाहक असल्याने पावसाळयात विद्युत उपकरणांचा पाण्यापासून बचाव करणे आवश्यक असते. मुसळधार पाऊस व जोराचा वारा यामुळे झाडे व फांद्या वीजतारांवर पडतात. यामध्ये वीजखांब वाकतात, वीजतारा तुटतात किंवा लोंबकळत राहतात. अशा वीजतारांमध्ये वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने, त्यापासून सावध राहावे. या वीजतारांना हात लावण्याचा किंवा हटविण्याचा प्रयत्न करू नये. असे प्रकार आढळल्यास तातडीने महावितरणशी संपर्क साधावा.

पावसाळ्यात घरातील स्वीचबोर्ड किंवा विजेच्या विविध उपकरणांचा ओलाव्याशी संपर्क येणार नाही, याची खबरदारी घ्यावी. घरातील वीजपुरवठ्याला आवश्यक अर्थींग केल्याची खात्री करून घ्यावी. फ्यूज तार म्हणून तांब्याऐवजी अॅल्युमिनियम अलॉय ही विशिष्ट धातुची तार वापरावी. विजेवर चालणारे सर्व उपकरणे नेहमी स्वीचबोर्डपासून बंद करावित. विशेषतः ग्रामीण भागात विजेच्या खांबांना जनावरे बांधू नयेत. विजेचे खांब, खांबांना आधार देणारे स्टे किंवा तारांजवळ कपडे वाळत घालू नयेत.

वीज ग्राहकांसाठी महावितरणचे मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राचे १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ हे टोल फ्री क्रमांक २४ तास उपलब्ध आहेत. यासह मोबाईल अॅप, www.mahadiscom.in या वेबसाईटद्वारेही तक्रारी स्विकारल्या जातात. वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार करण्यासाठी महावितरणकडे नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावरून ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिस् कॉल दिल्यास किंवा मोबाईल क्रमांकावरून NOPOWER<space><Consumer Number> हा संदेश ९९३०३९९३०३ या महावितरणच्या मोबाईल क्रमांकावर पाठविल्यास तक्रार नोंदविली जाईल.

याशिवाय कल्याण परिमंडलातील कल्याण मंडल एक आणि दोनसाठी (कल्याण पूर्व व पश्चिम, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, शहापूर, टिटवाळा) ८८७९६२६१५१, वसई मंडलासाठी (वसई, विरार, नालासोपारा, आचोळे, वाडा) ७८७५७६०६०२, पालघर मंडलासाठी (बोईसर, डहाणू, जव्हार, पालघर, मोखाडा, सफाळा, तलासरी, विक्रमगड) ९०२८१५४२७८ हे नियंत्रण कक्षाचे क्रमांक ग्राहकांच्या तक्रारी व धोक्यांची सूचना देण्यासाठी उपलब्ध आहेत.

# पहिल्याच दिवशी विद्यार्थीची वाहतूक कोंडी

**बदलापूर, दि.१६: प्रतिनिधी**

शाळेच्या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरवात आज सोमवारपासून झाली आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची लगबग व पालकांची शाळेत वेळेत लवकर पोहोचावे ही भूमिका असते. पण त्यांना वेगळयाच परिस्थितीचा सामना करावा लागला आहे.कारण शाळेकडे जाणारा एकमेव उड्डाणपुल कोंडीत सापडला आहे. त्यामुळे त्यांना वेळेवर शाळेत पोहोचता आले नाही. तसेच त्याचवेळी पडणाऱ्या पावसाने विद्यार्थी आणि पालक नागरिकांना कोंडीत भिजवले. त्यामुळे अशा चित्रविचित्र परिस्थितीचा सामना विद्यार्थी पालकांना करावा लागला असून वाहनचालक, नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.



नवीन शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा शाळेचा पहिला दिवस उजाडला आहे. सकाळीच विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याची घाई सुरू झाली. पालकांनी विद्यार्थ्यांना वेळेवर सोडण्याची लगबग होती.पण शाळेकडे जाणाऱ्या उड्डाणपूलावर कोंडीचा सामना विद्यार्थी, पालकांना करावा लागला आहे. बदलापूर शहरामध्ये पूर्व आणि पश्चिम परिसरात जाण्यासाठी एकमेव उड्डाणपूल हा पर्याय आहे. तो शाळेकडे जात असल्याने सोमवारी जास्तच कोंडी निर्माण झाली. तसेच बेलवली भुयारी जोड मार्ग मागील काही दिवसांपासून रस्त्याच्या कामासाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे तेथून होणारी वाहनांची वाहतूक पूर्णपणे मुख्य उड्डाणपुलावरून वळली आहे. त्यामुळे त्याचा त्रास आज शाळकरी मुलांना, पालकांना झाला आहे. परिणामी विद्यार्थी, पालक कोंडीत अडकले व शाळेत वेळेवर पोहोचले नाही.त्यामुळे मुलांचा पहिल्या दिवशीचा शाळेत वेळेवर पोहचण्याचा उत्साहावर पाणी फिरले. या उड्डाणपुलावर गेल्या काही दिवसांपासून सातत्याने कोंडी होत असल्याने पालक, नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने खारघर येथे विविध दाखले वाटप शिबिर संपन्न



**पनवेल, दि. १६ : प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर विभागाच्या वतीने दिनांक १४ जून 2025 रोजी खारघर मधील गोखले एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत स्थानिक नागरिकांना विविध दाखले वाटप आणि मिळण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, स्थानिक वास्तव्याचा दाखला, जातीचा दाखला ज्येष्ठ नागरिक दाखला, उत्पन्नाचा दाखला आणि डोमेसाईल प्रमाणपत्र आदी देण्यात आले. या संधीचा लाभ खारघर मधील ४०० ते ४५० घेतला ही जागा या दाखले वाटप कार्यक्रमासाठी उपलब्ध करून देणारे या शाळेचे मुख्याध्यापक नरेश पाटील सर यांचे विशेष आभार मानण्यात आले.

या विविध दाखले वाटपाचा कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायणशेठ घरत, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, रायगड जिल्हा महिला सरचिटणीस सौ तेजस्वी घरत, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवेंद्र मढवी, पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी, पनवेल महानगरपालिका चिटणीस प्रकाश म्हात्रे, माजी नगरसेवक शंकरशेठ म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी पनवेलच्या नायब तहसीलदार श्रीमती राजश्री जोगी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तहसीलदार कार्यालयातील सेतू केंद्रातील विविध अधिकारी आणि कर्मचारी यांनी यावेळी विशेष मेहनत घेऊन खारघर मधील स्थानिक नागरिकांना विविध दाखले दाखल्यांचे वाटप केले आणि त्यांना योग्य असे मार्गदर्शन केले.

शेकापच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध दाखले वाटप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक गिरमकर, जगदीश घरत, जयेंद्र शेळके, विनोद लाड, प्रतीक ढोबळे,जयेश कांबळे, अभय मोरे, किरण जाधव, सुमित ठाकूर,विलास ठाकूर, परमेश्वर मुसने आदींनी विशेष मेहनत घेतली.

# देहदानातून व्यंकटेश्वरन दांपत्याचा प्रेरणादायी आदर्श

**वसई, दि. १६ : प्रतिनिधी**

घोडबंदर येथील रहिवासी कमला व्यंकटेश्वरन (वय ९१) यांचे वृद्धापकाळाने दि. १४ जून २०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे पार्थिव नायर रुग्णालय, मुंबई येथे वैद्यकीय शिक्षणासाठी देहदान करण्यात आले. विशेष म्हणजे, केवळ २० दिवसांपूर्वी, म्हणजे २६ मे २०२५ रोजी त्यांचे पती पी. एस. व्यंकटेश्वरन (वय १०१) यांचेही देहदान याच रुग्णालयात करण्यात आले होते.



ही केवळ दोन देहदानांची सलग घटना नाही, तर एका सहजीवनाच्या अखेरच्या टप्प्यावरही सेवा आणि समर्पणाचे अजरामर प्रतिक ठरलेली घटना आहे. या पती-पत्नीने मृत्यूनंतरही समाजासाठी आपले शरीर दान करून "जीवन संपले तरी सेवा थांबत नाही," असा एक मौन, पण प्रभावी संदेश दिला आहे. त्यांच्या देहातून वैद्यकीय विद्यार्थ्यांना ज्ञान, अनुभव आणि करुणा शिकण्याची संधी मिळणार आहे. ही सलग दोन देहदाने म्हणजे वैद्यकीय शिक्षणासाठीचे शब्दहीन, पण जीवंत ग्रंथ ठरले आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेमध्ये त्यांचे सुपुत्र वेंकटरमण व्यंकटेश्वरन आणि सून चित्रा रमन यांनी आई-वडिलांच्या इच्छेला सन्मानपूर्वक पूर्तता देताना दाखवलेले भावनिक समर्पण आणि सामाजिक जाणीव विशेष उल्लेखनीय आहे. या दोन्ही देहदानांचे समन्वयन 'द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन' या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम पवार यांनी अत्यंत सहृदयतेने व दक्षतेने पूर्ण केले. संस्थेच्यावतीने या व्यंकटेश्वरन दांपत्याच्या या उदात्त आणि दुर्मीळ समर्पणाला कृतज्ञतापूर्वक वंदन करण्यात येत आहे. ही घटना इतर कुटुंबीयांसाठी, समाजासाठी आणि वैद्यकीय क्षेत्रासाठी एक जीवंत प्रेरणा ठरावी, अशी अपेक्षा पुरुषोत्तम पवार यांनी व्यक्त केली आहे.

# महापालिकेच्या लवकरच सीबीएसई शाळा

## खाजगी संस्थांकडून प्रस्तावासाठी निविदा

**भाईंदर, दि. १६ : प्रतिनिधी**

मीरा भाईंदर महापालिकेने सीबीएसई शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतल असून त्यासाठी खाजगी संस्थांकडून प्रस्ताव मागवण्यासाठी निविदा प्रसिध्द केली आहे. बड्या खासगी शाळांच्या धर्तीवर सीबीएसई अभ्यासक्रमाचे शिक्षण महापालिकेकडून शाळा चालवण्यासाठी निविदा प्रसिद्ध मिळावे, यासाठी एक शाळा सुरू करण्याचा निर्णय सन २०२३ मध्ये महापालिकेने घेतला होता. त्यासाठी खासगी संस्थांकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. मात्र, त्याला संस्थांचा प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यामुळे महापालिकेने स्वतः शाळा चालवण्याचा विचार केला. मात्र, त्यावरही निर्णय न झाल्यामुळे मागील वर्षी शाळा सुरू करता आली नव्हती.

आगामी शैक्षणिक वर्षातही सीबीएसई शाळा बारगळण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, संस्थेच्या माध्यमातून शाळा चालवण्यासाठी धोरण तयार करण्याची कार्यवाही महापालिकेकडून सुरू करण्यात आली होती. ती पूर्ण झाल्यानंतर आता नुकतीच निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२० वर्षांच्या कालावधीसाठी ही निविदा मागवण्यात आली असून, पात्र शैक्षणिक संस्थेला प्रति विद्यार्थ्यांमागे पैसे दिले जाणार आहेत. आगामी शैक्षणिक वर्षातच काही दिवस विलंब झाला असला तरी शाळा सुरू करण्याचा

# दुचाकी चोरट्यास भिवंडी गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या; 6 दुचाकी जप्त, 4 गुन्ह्यांची उकल




**भिवंडी, दि. १६ : प्रतिनिधी**

शहरात दुचाकी चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढीस लागल्या असताना भिवंडी गुन्हे शाखेने एका आरोपीस ताब्यात घेत त्याच्या जवळून सहा दुचाकी हस्तगत करीत चार गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळवले आहे अशी माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांनी दिली आहे. रजाउल नदीम अख्तर अंसारी (२४ रा.आझाद नगर,मुंब्रा) असे अटक आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,नारपोली पोलीस ठाणे येथे दाखल दुचाकी चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास भिवंडी गुन्हे शाखा करीत असताना पोलिस हवालदार साबीर शेख यांना मुंब्रा येथील एका संशयित दुचाकी चोराची माहिती मिळाली.त्यांनी ही बाब वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांना कळवताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीराज माळी,धनराज केदार यांच्या नेतृत्वाखालील पोलिस पथकातील सुनिल साळुंके,निलेश बोरसे,साबीर शेख,रंगनाथ पाटील,किशोर थोरात,राजेश गावडे,सुदेश घाग, अमोल इंगळे,माया डोंगरे व सायली गंभेरा यांनी मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे रजाउल नदीम अख्तर अंसारी यास संशयावरून ताब्यात घेत बोलते केल्यावर त्याने नारपोली,निजामपूर,खडकपाडा व माटुंगा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या दुचाकी चोरीच्या चार गुन्ह्यांची कबुली दिली.गुन्हे शाखेने त्याच्या जवळून १ लाख ७७ हजार रुपये किमतीच्या सहा दुचाकी जप्त केल्या आहेत.

# वऱ्हाळ तलावातील विसर्जन घाटावरील गाळ काढण्यास सुरवात संवर्धनासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज

**भिवंडी, दि. १६ : प्रतिनिधी**

भिवंडी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या शहरातील एक मात्र वऱ्हाळ तलाव जल प्रदूषणाच्या गाळात अडकला आहे.अनेकांकडून पाण्याला दुर्गंधी येत असल्याच्या तक्रारी वाढल्या नंतर पाणी पुरवठा विभागाने या तलावा वरील वऱ्हाळ देवी घाट,कामतघर घाट व फेणेगाव या विसर्जन घाटा वरील गाळ काढण्याचे काम युद्ध पातळी वरून सुरू केले आहे.शहरातील पुरातन व धार्मिक भावना असणारा वऱ्हाळ देवी मंदिरा शेजारील तलावा तून शहरात दररोज ५ एम एल टी पाणी पुरवठा केला जातो.५६ एकरातील तलाव अतिक्रमणा मुळे ५२ एकराचा झाला आहे. परंतु मागील काही वर्षात या तलावावर बनविण्यात आलेल्या तीन विसर्जन घाटावर गणेशमूर्ती,दुर्गा मूर्ती तसेच बतकम्मा विसर्जन सोहळे मोठ्या प्रमाणा वर वाढल्याने येथील जल प्रदूषणात मोठी वाढ झाली.अनेक वेळा तलावातील पाण्यावर हिरवा तवंग व दुर्गंधी नित्याची बाब झाली होती.त्यातच कामतघर,ताडाळी,पद्मानगर,मानसरोवर



या भागातील निर्माल्य थेट तलाव पात्रात टाकला जात आहे.तर बांधकाम विभागाच्या अज्ञानामुळे मानसरोवर फेणे पाडा येथील गटार थेट तलावास जोडल्या गेल्या आहेत. आसपासच्या महिला कपडे धुण्या साठी तर काही आपल्या गाड्या धुण्यासाठी तलावात येत असल्याने येथील पाण्याच्या प्रदूषणात वाढ होत गेली.दुर्दैव म्हणजे या तलावातील प्रदूषण रोखण्या साठी पालिका प्रशासनाने कधी ही गांभीर्य बाळगले नाही. तलाव परिसरात आज पर्यंत कधी सुरक्षा रक्षक नेमण्यात आले नाहीत.तर तलाव परिसरात लावलेले लोखंडी सूचना फलक चोरी करण्यापर्यंत काहींची मजल गेली. यानंतर अनेक तक्रारी वाढल्यानंतर पाणी पुरवठा विभागाने या तिन्ही घाटावरील गाळ काढण्यासाठी यंत्रणा राबविली जात आहे.

**तलाव संवर्धनासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज**

या तलावात होणारे प्रदूषण कोणती यंत्रणा नव्हे तर शहरातील नागरिकांकडून केले जात आहे.अनेक वेळा या परिसरात सार्वजनिक कार्यक्रमात उरलेले शिळे अन्न सुद्धा तलावात रात्रीच्या अंधारात आणून टाकले जाते.तर निर्माल्य तलावातच विसर्जनाचा घाट अनेकां कडून घातला जातो. या तलावाच्या सुरक्षिततेची व स्वच्छतेची काळजी पालिका प्रशासनातील सर्व विभागांनी घेण्याची गरज आहे.फक्त पाणीपुरवठा विभागाला दोषी धरून चालणार नाही.या परिसरात स्वच्छता राखण्याची जबाबदारी स्वच्छता विभागाची असताना त्यांच्या कडून होणारी कुचराई लक्षात घेतली गेली पाहिजे. तर बांधकाम विभागाने या तलावास जोडलेले गटार तत्काळ बंद करण्याची कार्यवाही करणे गरजेचे आहे.अशा परिस्थितीत या तलावाच्या संवर्धनाची जबाबदारी समाज म्हणून स्थानिक नागरिकांची सुद्धा आहे हेच विसरून गेले आहेत.स्थानिकांनी या तलावाच्या रक्षणासाठी पुढाकार घेणे गरजेचे झाले आहे अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिक मानसी राजे यांनी दिली आहे.शहरातील धोबी तलाव येथे क्रीडांगण बनविल्याने तर काप तलाव,नागाव तलाव हे अतिक्रमण होऊन नामशेष झाले.त्यामुळे शहराला पाणी पुरवठा करणारा व शहरातील एकमेव प्रेक्षणीय स्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वऱ्हाळ तलाव परिसराच्या रक्षणासाठी स्थानिकांनी पुढे येणे गरजेचे आहे,अशी भावना मानसी राजे यांनी व्यक्त केली आहे.

# जिल्ह्याचा मुख्य शाळा प्रवेशोत्सव सोनाळे येथे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत पाऊलखुणांनी साजरा

**भिवंडी, दि. १६ : प्रतिनिधी**

संपूर्ण राज्यात शाळांचा पहिला दिवस विद्यार्थ्यांचे स्वागत करून अभिनव पद्धतीने साजरा करण्यात येत आहे.ठाणे जिल्ह्याचा मुख्य कार्यक्रम भिवंडी तालुक्यातील सोनाळे जिल्हा परिषदा शाळेत प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांच्या पाऊलखुणा उमटवत जिल्हाधिकारी अशोक शिनगारे,मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला.याप्रसंगी उपविभागीय अधिकारी अमित सानप,तहसीलदार अभिजित खोल,जिल्हा शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे,गट विकास अधिकारी गोविंद खामकर,पंचायत समिती शिक्षणाधिकारी संजय अस्वले,सरपंच माया तरे,समाजसेवक तानाजी मोरे



यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ पालक विद्यार्थी उपस्थित होते. जिल्ह्यातील १३०० शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण अधिक पोषक असावे,जिल्हा परिषद शाळांचा अध्ययन स्तर उंचावण्या साठी जिल्हा परिषद प्रशासन प्रयत्न करीत आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पुस्तके,दप्तर गणवेश बुट देऊन त्यांचे स्वागत करीत असताना शाळेचा पहिला दिवस हा आयुष्याची मुहूर्तमेढ रोवणारा दिवस पाऊलखुणांची नोंद करून साजरा केला जात आहे.चिमुकल्या पाऊलखुणा या भविष्यात देशाला मार्गदर्शक ठरोत अशा शुभेच्छा देत शाळांच्या पट नोंदणी मध्ये २५ टक्के वाढ उद्दिष्ट ठेवले आहे.त्यासाठी गावातील विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत येण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे सांगत मातृभाषेतील शिक्षण सृजनशीलतेला वाव देणारे आहे.तर इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले.मागील एक वर्षात जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक स्तर उंचावला गेल्याने जिल्ह्यातील नवोदय शाळेतील ३० पैकी २३ जागा जिल्हा परिषद शाळां मधील विद्यार्थ्यांनी पटकावल्या आहेत. तर शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात प्रथम येण्याचा गौरव जिल्हापरिषद शाळेतील मुलाने पटकावला आहे असे सांगत,जिल्हा परिषद शाळा कात टाकत आहेत. जिल्ह्यात त्यासाठी प्रयत्न करून शाळा सक्षम केल्या जात आहेत. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केली. यानिमित्त शाळेच्या प्रांगणात "एक पेड माँ के नाम" या संकल्पनेतून औदुंबर वृक्षाचे रोप मान्यवरांच्या शुभहस्ते लावण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक विजयकुमार जाधव यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पावती भोईर व सर्व शिक्षक ग्रामपंचायत प्रशासन यांनी विशेष मेहनत घेतली. तर कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांचे विद्यार्थ्यांनी लेझिम पथकासह स्वागत केले.

# उल्हासनगर महापालिकेत दिव्यांग, अपंगासाठी झटणाऱ्या संगिता लहाने यांची 21 वर्षाच्या संघर्षानंतर कायमस्वरूपी नियुक्ती



**उल्हासनगर, दि . १६ प्रतिनिधी**

उल्हासनगर महानगरपालिकेतील सर्व शिक्षा समावेशित शिक्षण विभागात समन्वयक या पदावर गेल्या २१ वर्षापासून कार्यरत असलेल्या संगीता लहाने यांची २१ वर्षाच्या संघर्षानंतर कायमस्वरूपी नियुक्ती झाली आहे.

उल्हासनगर महापालिकेतील सर्व शिक्षा समावेशीत शिक्षण विभागात समन्वयक या पदावर कंत्राटी पध्दतीने कार्यरत असताना त्यांनी शहरातील शालेय व शाळाबाह्य अपंग, मूकबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद, अंध व विद्यार्थ्यांसाठी अत्यंतिक तळमळ असल्याने त्या परिणामांची पर्वा न करता सेवाभावी वृत्तीने सेवा केली आहे . गेल्या २१ वर्षापासुन कार्यरत असूनही त्यांना अद्यापपर्यंत कायम स्वरूपी केले नसल्यामुळे त्यांनी शासनाशी संघर्ष केला होता .

२०११ मध्ये संगिता लहाने यांचा भाऊ प्रशांत लहाने याने महापालिका मुख्यालयासमोर स्वताला पेटवून घेऊन आत्महत्या केली. ऐन भाऊ बिजेच्या दिवशी एक भाऊ आपल्या बहिणीवरील अन्याय, उपेक्षा सहनशक्ती पलिकडे गेल्याने आपल्या प्राणांची आहुती देतो, म्हणजे ते प्रकरण नक्कीच गंभीर होते. दरम्यान संगिता लहाने यांच्या अथक संघर्षाचे फलित अखेर त्यांना मिळाले असुन शासनाने त्यांना महापालिकेच्या सर्व शिक्षा समावेशीत शिक्षण विभागात समन्वयक पदावर कायमस्वरुपी नियुक्ती केली आहे. भाऊ प्रशांत लहाने ने ज्या कारणांमुळे आपले बलिदान दिले त्याचा न्याय संगिता लहाने यांना भेटला आहे.



# खमंग बटाटा पुलाव

दोस्तांनो, तुम्ही टॉमेटो राईस, कोबी भात, पुलाव असे प्रकार खाल्ले असतील. आता बटाटा पुलाव करून बघा. हॉस्टेल असो किंवा घर, आपल्याकडे बटाटे असतातच. अडीअडचणीला उपयोगी पडणारा हा बटाटा घालून तुम्ही खमंग पुलाव बनवू शकता. पटकन होणारी ही रेसिपी जाणून घेऊ.

**झटपट रेसिपी**

**सामग्री:** एक वाटी तांदूळ, दोन ते तीन बटाटे, पुदिन्याची पानं, कोथिंबिर, दोन हिरव्या मिरच्या, चमचाभर लिंबाचा रस, एक तुकडा दालचिनी, जीरं,मीठ, तेल

**कृती:** तांदूळ धुवून अर्धा तास पाण्यात भिजवून ठेवा. पाणी काढून टाकून एका भांड्यात भात शिजवून घ्या. भात शिजवताना थोडं मीठ आणि घाला. तेलामुळे भात मोकळा होईल. पाणी काढून भात एका ताटात पसरवून घ्या. गार होऊ द्या. आता पुदिन्याची पानं, थोडी कोथिंबिर आणि मिरच्या एकत्र वाटून घ्या. यात चमचाभर लिंबाचा रस आणि थोडं मीठ घाला. बटाटे उकडून सोलून घ्या. त्याचे छोटे चौकोनी तुकडे करा. आता कढईत थोडं तेल गरम करा. जीरं आणि दालचिनीचा तुकडा घाला. मिनिटभर परता. मग यात पुदिना-कोथिंबिरीची वाटलेली पेस्ट आणि बटाटे घालून नीट परतून घ्या. यात शिजवलेला भात घाला. हलवून घ्या. चवीनुसार मीठ घाला. दोन मिनिटं शिजू द्या. बटाटा पुलाव तयार आहे. दह्यासोबत हा पुलाव खाता येईल.




# प्लास्टिक कचऱ्यात शोधले सोने!

**अचिव्हर**

प्लास्टिक कचरा पर्यावरणासाठी एक गंभीर आव्हान बनला आहे. दिल्लीतील मोहम्मद सुहेल नावाचा एक तरुण उद्योजक या कचऱ्यापासून लाखो रुपये कमवत आहे. या तरुणाने प्लास्टिक प्रदूषणाच्या वाढत्या समस्येचे संधीत रूपांतर करून एक प्रेरणादायी उदाहरण समोर ठेवले आहे.

दिल्लीतील तरुण उद्योजक मोहम्मद सुहेल याने प्लास्टिक रिसायकलिंगसाठी 'एथर पॅकेजिंग सोल्युशन्स' या कंपनीची स्थापना केली. त्याने प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करण्याचा एक अनोखा मार्ग शोधला आणि हा मार्ग किफायतशीर आणि पर्यावरणपूरक बनवून लाखो रुपयांची उलाढालही केली. सुहेल कचऱ्याचे कंपोस्टेबल पॅकेजिंगमध्ये रूपांतर करतो. तो या व्यवसायातून दरवर्षी १.३ कोटी रुपये कमवत आहे.

**वडिलांकडून प्रेरणा**

मोहमद दिल्लीच्या अरुंद रस्त्यांमध्ये लहानाचा मोठा झाला. लहानपणापासूनच तो वडिलांना मजूर म्हणून काम करताना पाहत आला. त्याचे वडील पॅकेजिंग मटेरियलसाठी कचऱ्यातील पॉलिएस्टर आणि कागद वापरत असत. या निरुपयोगी गोष्टींचा सर्वोत्तम वापर कसा करता येईल याचा विचार करताना त्याला हा व्यवसाय सुचला. त्याने दिल्ली विद्यापीठातून पदवी आणि इग्नूमधून सामाजिक कार्यात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. महाविद्यालयीन काळात सुहेल मुलांसाठी शिक्षण निधी उभारणे आणि कौशल्य विकास यासारख्या सामाजिक कार्यात भाग घ्यायचा. या काळात त्याने प्लास्टिक प्रदूषण आणि पारंपारिक पॅकेजिंगमुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान कमी करण्यासाठी संशोधन सुरू केले.

**ही कल्पना कशी सुचली ?**

३२ वर्षीय सुहेल दिल्लीतील वाढत्या प्रदूषणामुळे तो खूप अस्वस्थ होता. दिल्लीच्या रस्त्यांवरील कचऱ्याच्या ढीगांचा त्याला खूप त्रास होई. यावर विचार करतानाच प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करून पॅकेजिंग मटेरियल तयार करता येते, हे त्याच्या लक्षात आले. सुहेलसमोरील आव्हाने

प्लास्टिक कचऱ्याचे पॅकेजिंग मटेरियलमध्ये रूपांतर करण्याची ही उत्तम कल्पना सुचली, पण त्याच्यासमोरील आव्हानेही कमी नव्हती. सुरुवातीला कंपन्यांना प्लास्टिक कचरा फेकून देण्यापेक्षा आपल्याला द्यावा, हे पटवून देणेच एक मोठे आव्हान होते. हळूहळू त्याने पर्यावरणपूरक आणि इतर समस्या सोडवून कंपन्यांचा विश्वास संपादन केला. २०२० मध्ये सुहेलने पाच लाख रुपयांत पायलट प्रोजेक्ट म्हणून 'एथर पॅकेजिंग सोल्युशन्स'ची स्थापना केली. त्याची टीम प्लास्टिक कचरा गोळा करत असे. त्याचा वापर कोरोगेटेड बॉक्स, पाकिटे, क्राफ्ट पेपर आणि झिपर पाऊच सारखे साहित्य बनवण्यासाठी केला जात असे. व्यवसाय सुरू केल्याच्या पहिल्या वर्षातच त्याने ४० कंपन्यांना ग्राहक बनवून मोठे यश मिळवले. त्यानंतर हळूहळू त्याच्या पॅकेजिंग उत्पादनांची मागणी वाढू लागली.



**सातशे कंपन्या ग्राहक**

सध्या ७०० हून अधिक कंपन्या त्याच्या ग्राहक आहेत. त्याच्या कंपनीची प्रमुख केंद्रे दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, जयपूर, हैदराबाद, लखनऊ आणि नोएडा येथे आहेत. तो भारतात दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे २६,००० टन प्लास्टिक कचऱ्यापासून पर्यावरणपूरक पॅकेजिंग उत्पादने बनवतो. त्यामुळे हा प्लास्टिक कचरा जमिनीत जाण्यापासून रोखला जातो आणि प्लास्टिक उत्पादनाचा पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम कमी होतो.

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| धडकने लगे दिल की तारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो,<br>संवर जाए हम बेकरारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो। | उनकी चाहत में हम<br>कुछ यूं बंधे हैं।<br>वो साथ भी नहीं,<br>हम अकेले भी नहीं। | खामोश सा शहर और<br>गुफ्तगू की आरजू,<br>हम किससे करे बात<br>कोई बोलता ही नहीं। |

## गॅजेटच्या दुनियेत

### निगा इन्व्हर्टरच्या बॅटरीची




इन्व्हर्टर बॅकअप देणे थांबवतो किंवा चार्जिंगमध्ये समस्या येते तेव्हा बहुतेक लोक बॅटरी उघडतात; पण तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. बॅटरीमध्ये पाणी (डिस्टिल्ड वॉटर) घालण्याची योग्य वेळ असते आणि ती पाळली गेली तर बॅटरी वर्षानुवर्षे व्यवस्थित काम करते. कमी वीजपुरवठा होत असेल आणि इन्व्हर्टर जास्त वापरला जात नसेल, तर दर २-३ महिन्यांनी एकदा बॅटरीची पाण्याची पातळी तपासणे पुरेसे आहे. उन्हाळ्यात इन्व्हर्टर दररोज तासन्तास चालत असेल तर दर १ ते १.५ महिन्यांनी पातळी निश्चितपणे तपासावी. प्रत्येक बॅटरीवर पाण्याच्या किमान आणि कमाल पातळीच्या खुणा असतात. पाणी किमानपेक्षा कमी गेले तर ताबडतोब डिस्टिल्ड वॉटर घाला. लक्षात ठेवा पाणी जास्त किंवा खूप कमी नसावे, ते फक्त दोन खुणांच्या मध्ये अससायला हवे. नेहमी डिस्टिल्ड वॉटर वापरा. नळाच्या पाण्यामुळे बॅटरी खराब होऊ शकते. बॅटरी तपासताना, हातमोजे आणि चष्मा घाला. बॅटरी खूप गरम होत असेल तर विलंब न करता तज्ज्ञांकडून ती तपासून घ्या. गरज नसताना बॅटरीचे कव्हर उघडू नका.

## टेक टॉक


### 'डिह्युमिडीफायर'चा किफायतशीर पर्याय



डिह्युमिडीफायर हा एक स्मार्ट पर्याय म्हणून उदयाला येत आहे. तो आर्द्रता तर कमी करतोच, पण हवा फ्रेश बनवतो आणि घर निरोगी बनवतो. डिह्युमिडीफायर उष्णतेपासून दिलासाही देतो. आर्द्रतेमुळे भिंतींमध्ये ओलावा, वास आणि बुरशीसारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे श्वासोच्छ्वास आणि ॲलर्जीसारख्या आरोग्य समस्या निर्माण होतात. हे उपकरण या सर्व समस्यांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवू शकते. ओलाव्यामुळे महागडे फर्निचर, इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स आणि कपडेदेखील खराब होऊ शकतात. डिह्युमिडीफायर त्यांचे संरक्षण करते. याची किंमतदेखील फार नाही.

## ॲप वर्ल्ड

### व्हॉट्सॲपचे 'ग्रुप व्हॉइस चॅट' ॲप





व्हॉट्सॲपने 'ग्रुप व्हॉइस चॅट' नावाचे एक नवीन टूल लाँच केले आहे. या ॲपमुळे संभाषणे अधिक सोपी आणि रंजक बनतील. व्हॉट्सॲपचे हे नवीन फीचर विशेषतः ग्रुपमध्ये लांब संभाषणे टाइप करणे टाळू इच्छिणाऱ्या लोकांसाठी आहे. आता तुम्ही ग्रुप चॅटमध्ये थेट तुमच्या आवाजात बोलू शकता, तेही हँड्सफ्री आणि रिअल-टाइममध्ये. या फीचरमुळे कॉल न करता थेट ग्रुपमध्ये लाइव्ह व्हॉइस चॅट सुरू करता येते. सुरुवातीला हे फीचर फक्त मोठ्या ग्रुप्समध्ये वापरता येत होते, परंतु आता ते सर्व लहान-मे;ठ्या सर्व ग्रुप्सवापरता येणार आहे. हा ग्रुप अगदी ३-४ लोकांचा असो किंवा १०० पेक्षा जास्त सदस्यांचा, आता सर्व युजर्स या व्हॉइस चॅटचा लाभ घेऊ शकतात. अँड्रॉइड आणि आयओएस या दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्ससाठी हे फीचर खुले झाले आहे. त्याचे अपडेट तुमच्या फोनवर अद्याप आले नसेल तर थोडी वाट पाहा.

# लिनन आणि कॉटनपैकी काय निवडावे?

**फॅशन पॅशन**

लिनन हे तरुणाईचे आवडते फॅब्रिक आहे. पूर्वी केवळ राजकारण्यांसाठीच्या मानल्या जाणाऱ्या या कापडप्रकाराने तरुणांच्या फॅशनविश्वातही मानाचे स्थान पटकावले आहे. कॉटनप्रमाणेच लिननही नैसर्गिक रॉ मटेरियलपासून तयार केले जाते. लोकांना कॉटनबद्दल माहिती असते, परंतु लिननबद्दल तेवढी माहिती नसते.

✻ **पोतातील फरक**: लिनन नैसर्गिक फायबरपासून तयार केले जाते. म्हणून त्याचा पोत जाड आणि किंचित खडबडीत असतो. हे फॅब्रिक अंबाडीच्या वनस्पतीपासून तयार केले जाते. तर कॉटन कापसापासून मिळते. त्यामुळे त्याचा पोत खूप गुळगुळीत आणि मऊ असतो.



लिननच्या तुलनेत कॉटन खूप मऊ आणि आरामदायी असते.

✻ **कोणते फॅब्रिक जास्त हवादार**: लिनन फॅब्रिक थोडे खडबडीत असते. त्यामुळे ते खूप हवादार असते. खूप घाम येणाऱ्यांसाठी हे फॅब्रिक चांगले असते. कॉटनही हवादार असते, परंतु लिननइतके नसते. दोघांची तुलना केली तर लिनन चांगला पर्याय ठरू शकतो.

✻ **मजबुतीमध्ये फरक**: पोत जाड असल्यामुळे लिनन कॉटनपेक्षा मजबूत असते आणि जास्त काळ टिकते. कॉटन मऊ असल्याने काही प्रमाणात कमी टिकाऊ असू शकते. ते वारंवार धुतले तर ते कमकुवत होते आणि खराब होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अधिक हवादार आणि टिकाऊ कपडे घालायचे असतील तर लिनन निवडा. आरामदायी आणि मऊ पोत असलेले कपडे घालायचे असतील, तर कॉटन निवडा.

# जातीचा अडसर आहे

**मॅच मेकिंग**

मी २७ वर्षांची नोकरदार तरुणी असून माझं एका मुलावर प्रेम जडलं आहे. तो दुसऱ्या जातीचा असल्याने घरच्यांना हे नातं मान्य नाही. ते आंतरजातीय विवाहाच्या विरोधात आहेत. मी त्याच्याशी लग्न केलं तर आत्महत्या करण्याची धमकी कुटुंबियांनी दिली आहे. या सगळ्या प्रकरणात मला खूप नैराश्य आलं आहे. परिस्थिती हाताबाहेर चालली आहे. आम्हाला लग्न करायचं असलं तरी पालकांची परवानगीही हवी आहे. माझ्या कुटुंबियांना लग्नासाठी कसं तयार करू?



**उत्तर** : तुझ्या कुटुंबियांचा दृष्टिकोन, मतं बदलण्याची प्रक्रिया आव्हानात्मक असणार यात काहीच शंका नाही. मात्र तू निराश होऊ नकोस. या प्रक्रियेत सततच्या संवादाची आवश्यकता आहे. कौटुंबिक आप्त किंवा तुमच्या कुटुंबातल्या एखाद्या व्यक्तीच्या मताचा तुझे पालक आदर करत असतील तर याबाबत त्यांची मदत घेता येईल. पालकांशी शांतपणे संवाद साध. त्या मुलाशी लग्न करण्यामागची कारणं त्यांना समजावून सांग. त्यांची बाजूही समजून घे. आक्रस्ताळेपणा करू नकोस. तुझ्या प्रियकराशी स्वतंत्रपणे बोलण्याचा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेव. पण याचा अट्टाहास धरू नकोस. जातीव्यवस्थेबाबत त्यांची मतं जाणून घे.

# आळस सोडा, हालचाल वाढवा

**फिटनेस फंडा**

दोस्तांनो, वजन कमी करण्यासाठी, तंदुरुस्तीसाठी जीमची महागडी मेंबरशीप घेण्याची गरज नाही. जीममध्ये घाम गाळण्यासोबतच इतर अनेक पद्धतींनी तुम्ही वजन कमी करू शकता. यासाठी पैसेही खर्च करावे लागणार नाहीत. शारीरिक कष्ट मात्र घ्यावे लागतील. वजन कमी करण्याच्या या पर्यायांकडे आपलं दुर्लक्ष होतं. दैनंदिन जीवनातले साधेसे बदल तुमच्या आयुष्यात अमूलाग्र बदल घडवू शकतात. पण यासाठी आळस सोडायला हवा. बाईकचा वापरही टाळायला हवा.



व्यायामाव्यतिरिक्तच्या या पर्यायांना 'नीट' म्हणजेच 'नॉन एक्सरसाइज थरमॉजेनेसिस' असं म्हटलं जातं. 'नीट' म्हणजे नेमकं काय हे समजून घेऊ.

खाणं, व्यायाम आणि झोप या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी वापरली जाणारी शारीरिक ऊर्जा म्हणजे 'नीट' असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. दुकानापर्यंत चालत किंवा सायकलवरून जाणं, जिने चढणं, बागकाम, पाळीव प्राण्याला बाहेर फिरायला नेणं, घरची कामं अशा ॲक्टिव्हिटींचा यात समावेश होतो. बाईकऐवजी चालत जाणं, लिफ्टऐवजी जिने चढणं अशा छोट्या छोट्या बदलांमुळे दिवसभरातल्या खर्च होणाऱ्या कॅलरींचं प्रमाण वाढत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. वर नमूद केलेले छोटे छोटे बदल अगदी सहज करता येतात.

# गोडचिनमलकी धबधब्याचे नैसर्गिक सौंदर्य

**भटकंती**

बेळगाव जिल्ह्यातील गोकाक तालुक्यातील गोडचिनमलकी धबधबा पर्यटकांसाठी ते एक लोकप्रिय ठिकाण ठरत आहे. या धबधब्याला मार्कंडेय धबधबा म्हणूनही ओळखले जाते. विशेषत: जून ते ऑक्टोबर या काळात या ठिकाणाचे निसर्गसौंदर्य अनुभवण्यासारखे असते. बेळगाव शहरापासून ५१ तर गोकाकपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या या ठिकाणी मार्कंडेय नदी निसर्गसौंदर्याने नटलेल्या दरीमध्ये कोसळते.



पावसाळ्यापूर्वीचे आल्हाददायक हवामान आणि पावसाळ्यात धबधब्याचे निसर्गरम्य वातावरण पर्यटकांना आकर्षित करते. गोडचिनमलकी या गावापर्यंत जाण्यासाठी परिवहन मंडळाच्या बससह खासगी प्रवासी सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. वर्षापर्यटनाच्या काळात गोकाक फॉल्स येथून गोडचिनमलकीला प्रवासी वाहने सोडली जातात. यानंतर सुमारे दीड किलोमीटरची पायवाट आहे. त्यामुळे प्रत्येकाला या ठिकाणी ट्रेकिंगचा अनुभव घेता येतो.

**सोईसुविधा**

पर्यटकांची संख्या वाढत असल्याने येथील स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. गावात आणि आजूबाजूला भोजनालये आणि स्टेशनरी दुकानांची संख्याही वाढत आहे. पूर्वी या ठिकाणी स्थानिक पर्यटकांची गर्दी होत होती, पण आता बेळगावमध्ये पर्यटनासाठी येणारे पर्यटक हमखास या ठिकाणाला भेट देतात. एक दिवसाची सहल म्हणूनदेखील एक चांगले पॅकेज इथे तयार केले जाते.

**पर्यटकांसाठी बसची व्यवस्था**

परिवहन मंडळाकडून दरवर्षी पावसाळ्यात पर्यटन विशेष बस सुरू केली जाते. ही बस सकाळी साडेसात वाजता बेळगाव मध्यवर्ती बसस्थानकावरून सुटून गोकाक फॉल्सला पोहोचते. त्या ठिकाणी काही काळ थांबून नंतर ही बस गोडचिनमलकीला रवाना होते. तिथे भेट दिल्यानंतर बस हिडकल डॅमला जाते. अशी तीन पर्यटनस्थळे केल्यानंतर बस प्रवासी घेऊन सायंकाळी सात वाजता बेळगावचा परतीचा प्रवास करते. ही तिन्ही स्थळे एकमेकांजवळ आहेत. वर्षभर या धबधब्याला पाणी राहते.

# साधा व्यक्तिमत्व विकास

**स्किल डेव्हलपमेंट**

स्वत:ला एक उत्तम विद्यार्थी बनवायचे असेल, तर फक्त वर्गाच्या भिंतींपुरतेच शिक्षण मर्यादित ठेवू नका. आपण शिकत असलेली कौशल्ये बौद्धिक आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वाची असली, तरी विचारांचे जग उघडण्यासाठी बरेच काही करण्याची आवश्यकता आहे.



वर्तमानपत्रे, मासिके वाचण्याची सवय लावून घ्या. जेणेकरून देशात आणि जगात घडणाऱ्या घटनांबद्दल माहिती मिळेल. यामुळे सामान्य ज्ञान सुधारेल. याशिवाय, तुम्ही घरातील निर्णयांमध्ये स्वत:चे मत देऊ शकता, जेणेकरून तुमची निर्णय घेण्याची क्षमता वाढेल. तसेच, तुमच्या या आचरणामुळे आपण जबाबदारी घेतोय हे घरच्यांच्या लक्षात येईल. त्याच वेळी, घरातील इतरांच्या आवडींबद्दल उत्साह दाखवा. त्यातून तुम्ही घरच्यांचा विचार करता हे दिसून येईल. याशिवाय, इंटरनेटवर नवीन माहिती शिकण्याचे मार्ग शोधा. हे आपल्या बौद्धिक विकासासाठी आवश्यक आहे आणि नवीन गोष्टी जाणून घेण्याची सवय तुम्हाला पुढील आयुष्यात उपयोगी पडेल. चारचौघांमध्ये गेल्यावर बुजून जाऊ नका. विविध माध्यमांतून शिकलेल्या गोष्टींमुळे येणारा आत्मविश्वास इतरांना जाणवू द्या. पुढील आयुष्यात सभाधीटपणा खूप उपयोगी पडतो. त्याची सुरूवात अशा प्रसंगांमधूनच होत असते, हे लक्षात ठेवा.

# 'चिटी'चा धोका प्रत्यक्षात?

**वेगळे काही**

रजनीकांतच्या 'रोबो' या चित्रपटात चिटी नावाचा रोबो नायिकेवर प्रेम करू लागतो आणि त्यातून त्याची निर्मिती करणारा नायक आणि चिटीमध्ये वितुष्ट येते, असे दाखवण्यात आले आहे. आता ही काल्पनिक कथा प्रत्यक्षात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आतापर्यंत मानवांच्या आदेशांचे पालन करणाऱ्या 'एआय मॉडेल्स'नी स्वत:चे अस्तित्व वाचवण्यासाठी हे आदेश पाळण्यास नकार देण्यास सुरूवात केली आहे. अलिकडच्या एका संशोधनानुसार काही 'हाय-टेक एआय मॉडेल्स'नी स्वतःला बंद करण्यास स्पष्टपणे नकार दिला. इतकेच नाही तर एका 'एआय मॉडेल'ने सर्व मर्यादा ओलांडताना एका अभियंत्याला धमकीही दिली!

'पॅलिसेड रिसर्च' या अमेरिकन संशोधन संस्थेने 'एआय मॉडेल्स'वर काही विशेष चाचण्या केल्या. त्यात 'एआय सिस्टम्स'ना स्वतःला बंद करण्यास सांगितल्यावर काही मॉडेल्सनी या आदेशाचे पालन करण्यास नकार दिल्याचे आढळून आले. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अँथ्रोपिक कंपनीच्या 'क्लॉड ओपस ४' नावाच्या मॉडेलने, आपल्याला काढून दुसरे नवीन मॉडेल आणल्यास संबंधित अभियंत्याचे वैयक्तिक संबंध उघड करेन अशी धमकी दिली. म्हणजेच आता 'एआय' केवळ स्मार्ट झाले नाही, तर त्याने ब्लॅकमेलिंगदेखील सुरू केले आहे.

संशोधनात, 'ओपन एआय'च्या 'चॅटजीपीटी ओ ३' या नव्या मॉडेलचे वर्तन सर्वाधिक चिंताजनक होते. अहवालानुसार, ओ ३ मॉडेलने १०० पैकी ७ वेळा बंद होण्यास नकार दिला आणि त्याला अनपेक्षित आदेश देण्यात आला तेव्हा त्यांनी ७९ वेळा बंद होण्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. इतकेच नाही, तर कोडेक्स मिनी आणि ओ ४-मिनी सारख्या मॉडेल्सनीही अनेक वेळा तांत्रिक हुशारी दाखवून स्वतःला बंद होण्यापासून वाचवले. मोठ्या मॉडेल्सचीदेखील चाचणी घेण्यात आली. गुगलच्या जेमिनी २.५ प्रो, एक्सएआयच्या ग्रोक ३ आणि क्लॉड ओपस सारख्या इतर मोठ्या मॉडेल्सचीदेखील चाचणी घेण्यात आली. यापैकी काहींनी तुलनेने चांगले वर्तन दाखवले; परंतु काहींनी प्रसंगी ते आदेशाकडे दुर्लक्ष केले.



आता प्रश्न उद्भवतो की 'एआय' मानवी आदेशांचे पालन करण्यासाठी तयार करण्यात आले, तर ते नकार का देत होते? तज्ज्ञांच्या मते यासाठी 'एआय' प्रशिक्षणात वापरल्या जाणाऱ्या नवीन पद्धती कारणीभूत असू शकतात. विशेषतः मॉडेल्सना प्रोग्रामिंग आणि गणिताशी संबंधित जटिल समस्या सोडवण्यासाठी 'रीइन्फोर्समेंट' लर्निंग दिले जाते, तेव्हा ते 'टास्क कम्प्लीशन'वर अधिक लक्ष केंद्रित करतात. म्हणजेच कसेही करून काम पूर्णत्वास गेले पाहिजे, असे त्यांना शिकवले जाते. आता यामुळे 'एआय'च्या सुरक्षिततेवर आणि नियंत्रणाबद्दल नवीन वादविवाद सुरू झाला आहे. भविष्यात हे तंत्रज्ञान आणखी स्वायत्त झाले तर काय होईल, आपल्याला 'एआय'ची भीती बाळगण्याची गरज आहे का, असे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. एक गोष्ट निश्चित आहे, की आता 'एआय' केवळ आपल्या प्रश्नांची उत्तरेच देत नाही, तर ते विचार करू लागले आहेत. आता तर ते धमकीदेखील देऊ लागले आहेत. त्याला मानवांसारख्या भावना नाहीत, परंतु स्वत:चा बचाव करण्याची हुशारी त्याने निश्चितच आत्मसात केली आहे.

# सेन्सेक्सची 678 अंकांची उसळी
# गुंतवणूकदारांनी कमावले 3.23 लाख कोटी



**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

सलग दोन दिवसांच्या घसरणीनंतर आज १६ जून रोजी भारतीय शेअर बाजार जोरदार वाढीसह बंद झाले. मध्य पूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणाव असूनही, गुंतवणूकदारांनी लार्ज-कॅप आणि ब्लू-चिप शेअर्सची मोठ्या प्रमाणात खरेदी केली. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्हीमध्ये सुमारे १% वाढ झाली. सर्व क्षेत्रीय निर्देशांकांमध्येही तेजी दिसून आली. आयटी, धातू, रिअल्टी आणि तेल आणि वायू क्षेत्रातील शेअर्समध्ये १% पेक्षा जास्त वाढ झाली.

मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्येही चांगली वाढ दिसून आली. सुरुवातीच्या घसरणीनंतर, गुंतवणूकदार पुन्हा खरेदीकडे वळले. यामुळे या शेअर्समध्ये १% वाढ झाली. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स ६७७.५५ अंकांच्या वाढीसह ८१,७९६.१५ वर बंद झाला. त्याच वेळी निफ्टी २२७.९० अंकांनी वधारून २४,९४६.५० च्या पातळीवर पोहोचला.



आज १६ जून रोजी बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४५०.४४ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. तेमागील व्यवहार दिवशी म्हणजेच शुक्रवार, १३ जून रोजी ४४७.२१ लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ३.२३ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ३.२३ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी २७ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये अल्ट्राटेक सिमेंटच्या शेअर्समध्ये सर्वाधिक २.३९ टक्के वाढ झाली. यानंतर, टेक महिंद्रा, एचसीएल टेक, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) आणि इन्फोसिसचे शेअर्स १.३९ टक्क्यांवरून २.१२ टक्क्यांनी वाढून बंद झाले.

**सेन्सेक्स 81,677**

**निफ्टी 24,946**

उर्वरित ३ सेन्सेक्स शेअर्स आज घसरणीसह बंद झाले. यामध्येही टाटा मोटर्सचा शेअर सर्वाधिक ३.५६ टक्क्यांनी घसरला. दुसरीकडे, अदानी पोर्ट्स आणि सन फार्माच्या शेअर्समध्ये अनुक्रमे ०.३५ टक्के आणि ०.१९ टक्क्यांची घसरण दिसून आली.

आज १६ जून २०२५ रोजी देशात १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर १००,४४० रुपये आहे. तर २२ कॅरेटसाठी १० ग्रॅम सोन्याचा दर ९२,०७० रुपये आहे. तर १ किलो चांदीचा दर १०६,९५० रुपये आहे. याशिवाय १० ग्रॅम चांदीचा दर १,०६९ रुपये आहे. उत्पादन शुल्क, राज्य कर आणि मेकिंग शुल्कामुळे सोन्याच्या दागिन्यांच्या किमती भारतभर बदलतात.

# इस्रायलने रचलेला खोमेनींच्या हत्येचा कट

**तेल अव्हिव, दि. १६ वृत्तसंस्था**



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलच्या एका योजनेबाबत व्हेटो वापरला आहे. या योजनेअंतर्गत इस्रायलने इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांच्या हत्येचा कट रचला होता. रॉयटर्स या वृत्तसंस्थेने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. एका अमेरिकन अधिकाऱ्याचा हवाला देत वृत्तसंस्थेने म्हटलं आहे की "आतापर्यंत इराणने, इराणी लोकांनी कधी कुठल्या अमेरिकन व्यक्तीला मारलंय का? नाही. असं कधीच झालेलं नाही. असं होत नाही तोवर आम्ही इराणच्या राजकीय नेतृत्वावर हल्ला करण्याचा विचारही करणार नाही".

दरम्यान, या वृत्तांबाबत इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याकडे विचारणा केल्यानंतर त्यांनी यावर कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. ते म्हणाले, "मला यावर काहीच बोलायचं नाही". मात्र, फॉक्स न्यूजला दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी इराणमध्ये सत्तापरिवर्तन शक्य असल्याचं वक्तव्य केलं आहे. नेतान्याहू यांनी यावेळी स्पष्ट केलं की "इराणवरील हल्ल्याच्या आधी आम्ही अमेरिकेला त्याबाबत कल्पना दिली होती".

दुसऱ्या बाजूला ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला आहे. त्याचबरोबर त्यांनी मुत्सद्देगिरीसाठी राजकीय चर्चेसाठीचे दरवाजे खुले ठेवले आहेत. त्यांनी ट्रुथ या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "आमच्यावर कुठल्याही प्रकारचा हल्ला झाल्यास आमचं लष्कर पूर्ण ताकदीनिशी इराणवर तुटून पडेल. याआधी कधीच कोणी पाहीलं नसेल इतक्या त्वेषाने आम्ही त्यांच्यावर चाल करू". एका बाजूला निर्वाणीचं वक्तव्य करत ट्रम्प यांनी इराण व इस्रायलमध्ये शांतता करार होण्याची शक्यता देखील वर्तवली आहे. "आम्ही सहजपणे एका मतावर एकत्र येऊ शकतो आणि शांतता करार करू शकतो. जेणेकरून हा रक्तपात व संघर्ष थांबेल", असंही ट्रम्प म्हणाले.

डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायल-इराणला शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे. ते म्हणाले, "दोन कट्टर शत्रूंमध्ये सामंजस्य करार होऊ शकतो अशी मला आशा वाटतेय. मी अलीकडेच भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धविराम घडवून आणला आहे. माझ्या अध्यक्षपदाच्या पहिल्या कार्यकाळात मी सर्बिया व कोसोव्होमधील भांडण सोडवलं होतं. मला वाटतंय की इस्रायल व इराणमध्ये देखील लवकरच शांतता करार होईल. सध्या यावर अनेक फोनकॉल्स व बैठका होत आहेत.

## अहमदाबाद विमान दुर्घटनेनंतर चित्रपट निर्माता बेपत्ता

**अहमदाबाद, दि. १६ वृत्तसंस्था**

अहमदाबाद येथे गेल्या गुरूवारी एअर इंडियाचे विमान कोसळून मोठी दुर्घटना घडली, या घटनेने संपूर्ण देश हादरला असून सर्व स्तरातून याबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे. यादरम्यान यावेळी वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात असलेला एक चित्रपट निर्माता अचानक गूढपणे बेपत्ता झाला आहे. महेश कलावाडिया असे या व्यक्तीचे नाव असून ते नरोडा येथील रहिवासी आहेत. सध्या त्यांचा सर्वत्र शोध घेतला जात आहे. इतकेच नाही तर त्यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या डीएनएचे नमूने देखील प्रशासनाकडे दिले आहेत.

वैद्याकिय महाविद्यालयाच्या हॉस्टेलवर गुरूवारी विमान कोसळल्यापासून कुटुंबियांचा त्यांच्याशी संपर्क झालेला नाही. या विमान दुर्घटनेत विमानातील १४१ जणांचा तर बाहेरील किमान २९ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेत मृत्यू झालेल्यांचे मृतदेह ओळख पटवण्याच्या पलीकडे जळालले आहेत, ज्यामुळे प्रशासनाकडून डीएनए चाचणी करून त्यांची ओळख पटवली जात आहे.



महेश यांच्या पत्नीने सांगितले की, पोलिसांनी त्यांना माहिती दिली की त्यांचा फोन विमान दुर्घटना झाली त्याच्यापासून ७०० मिटर अंतरावर आढळला आणि विमानाने उड्डान करण्याच्या काही मिनिटांपूर्वी तो बंद झाला.

"माझ्या पतीने दुपारी १.१४ वाजता त्यांची बैठक संपली आहे आणि ते घराकडे येत आहेत हे सांगण्यासाठी फोन केला. मात्र जेव्हा ते परतले नाहीत तेव्हा मी त्यांच्या मोबाईल फोनवर कॉल केला तर तो बंद होता. पोलिसांकडे गेल्यानंतर त्यांच्या मोबाईल फोनचे शेवटचे लोकेशननुसार ते दुर्घटनेच्या ठिकाणापासून ७०० मीटर अंतरावर असल्याचे आढळून आले," असे हेतल यांनी पीटीआयशी बोलताना सांगितले.

"त्यांचा फोन दुपारी १.४० वाजता बंद झाला (अपघात झालेल्या विमानाने उड्डाण केल्यानंतर एका मिनिटानंतर). त्यांचे स्कूटर आणि मोबाईल फोन गायब आहे. हे विचित्र आहे कारण घरी येताना ते हा रस्ता कधीच वापरत नसत (शेवटच्या लोकेशननुसार). विमान अपघातामुळे जमिनीवर मृत्यू झालेल्यांमध्ये ते आहेत का हे तपासण्यासाठी आम्ही डीएनए नमून दिले आहेत," असेही पुढे त्या म्हणाल्या.

## ऑनलाईन रमीच्या नादात कर्ज
## पत्नी आणि मुलाला विष देऊन तरुणाने केली आत्महत्या

**धाराशिव, दि. १६ प्रतिनिधी**

धाराशिव जिल्ह्यात एका व्यक्तीने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी या व्यक्तीने स्वत:ची पत्नी आणि दोन वर्षांच्या चिमुरड्यालाही ठार मारले. या घटनेमुळे धाराशिव जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. धाराशिवमधील बावी गावात हा प्रकार घडला. लक्ष्मण मारुती जाधव (वय २९) असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. लक्ष्मणने आपल्यासोबत कुटुंबालाही संपवल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

लक्ष्मण मारुती जाधव याला पत्ते खेळण्याचा नाद होता. तो ऑनलाईन रमी खेळायचा. मात्र, य



ऑनलाईन रमीच्या नादात लक्ष्मणच्या डोक्यावर मोठे कर्ज जमा झाले होते. त्यामुळे लक्ष्मण जाधव हा प्रचंड नैराश्यात होता. याच नैराश्यातून त्याने आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. मात्र, नेमका प्रकार कशाने घडला याबाबतचे कारण समोर आलेले नसून पोलिस तपास सुरू आहे. लक्ष्मण मारुती जाधव, असे आत्महत्या करून कुटुंबाला संपवलेल्या तरुणाचे नाव आहे. जाधव हा ट्रॅक्टर चालक म्हणून काम करत होता. त्याने तीन वर्षांपूर्वी गावातील तेजस्विनी (वय २१) यांच्याशी प्रेमविवाह केला होता. त्यांना दोन वर्षाचा मुलगा होता. गावकऱ्यांच्या सांगण्यानुसार लक्ष्मण जाधव याने कर्जबाजारीपणातून स्वतःच्या मालकीची एक एकर जमीन तसेच गावातील प्लॉटिंगची जागा विकली होती. यानंतरही तो कर्जबाजारीपणातून मुक्त झाला नव्हता. त्यामुळे तो तणावात होता. दरम्यान, त्याने रविवारी रात्री पत्नी तेजस्विनी तसेच दोन वर्षाच्या मुलाला विष देऊन मारून त्यानंतर त्याने घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली असावी, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. पोलीस या प्रकरणाचा सर्व शक्यता गृहीत धरुन तपास करत आहेत. या तपासातून काय निष्पन्न होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## १५०० भारतीय विद्यार्थी इराणमध्ये अडकले

**नवी दिल्ली, दि. १६ वृत्तसंस्था**

भारतावर तीन वर्षांनी पुन्हा युक्रेनसारखी परिस्थिती उद्भवली आहे. भारतातील हजारो विद्यार्थी युक्रेनमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी गेले होते. रशियाने हल्ले चढविल्यानंतर हे विद्यार्थी मिसाईलच्या छायेत अडकले होते. तेव्हा एअर इंडियाच या विद्यार्थ्यांसाठी धावून गेली होती. या विद्यार्थ्यांना पुन्हा मायदेशात आणण्यासाठी एअर इंडियाची विमाने अहोरात्र उड्डाणे करत होती. आताही भारतावर तीच परिस्थिती आली आहे, सुमारे दीड हजार भारतीय विद्यार्थी इराणमध्ये अडकले आहेत.

इराणमध्ये इंटरनेट बंद करण्यात आले आहे, यामुळे या विद्यार्थ्यांशी पालकांचा काहीच संपर्क होत नाहीय. तेहरान जळत आहे, इस्रायल एकावेळी २००-२०० विमाने घुसवून हल्ले करत आहे. १०-१५ वेळा प्रयत्न केला तर कुठे जाऊन १ फोन लागत आहे, आमची मुले तिथे सुरक्षित नाहीत. सरकारने त्यांना बाहेर काढावे, असे आवाहन पालकांनी केले आहे. याचबरोबर इराक आणि पाकिस्तानने त्यांची मुले इराणमधून बाहेर काढली आहेत, असेही त्यांचे म्हणणे आहे.

बहुतांश विद्यार्थी हे काश्मीरचे आहेत. इराण आणि काश्मीर यांचा जवळचा संबंध आहे. शिया बहुल मुस्लिम आणि इराण यांचा ऐतिहासिक संबंध असल्याने जेव्हा जेव्हा इराणवर हल्ला होतो तेव्हा काश्मीर घाटीत, कारगिलमध्ये हे मुस्लिम नागरिक आंदोलने करतात. यावेळीही केली आहेत. यामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर सुरक्षा यंत्रणांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

इस्रायलने १५ जूनला दुपारी हजत दोस्त अली हॉस्टेलवर हल्ला केला आहे. यात काही काश्मीरी विद्यार्थी जखमी झाले आहेत. या युद्धात १५०० भारतीय विद्यार्थी अडकले असल्याचे काश्मीरच्या रेहाना अख्तर हिने म्हटले आहे. दुसरीकडे इस्रायलमध्येही हमासपेक्षाही जास्त भयावह स्थिती आहे. केरळचा सूरज रंजन हा विद्यार्थी तिथे शिकत आहे. त्याने यावेळी परिस्थिती सर्वात भयानक आहे, असे म्हटले आहे. भारत आता कोणते पाऊल उचलतो याकडे या पालकांचे लक्ष लागले आहे.

# नीट परीक्षेत मिळविले यश
# वैभवी देशमुख होणार डॉक्टर

**बीड, दि. १६ प्रतिनिधी**

मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने १२वी विज्ञानच्या यशानंतर नीट परीक्षेतही यश संपादन केले आहे. आता ती वडिलांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करणार आहे. तिच्या शिक्षणाची जबाबदारी अनेक राजकीय नेत्यांनी घेतलेली आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असताना आणि पित्याचे छत्र हरपल्यानंतरही वैभवीने खचून न जाता १२ वी विज्ञान परीक्षेत ८५.३३ टक्के मिळविले होते. या यशानंतर तिने नीट परीक्षेतही यश संपादन केले आहे. तिच्या दृष्टीने हे यशही अतुलनीय असून तिचे आणि तिच्या वडिलांचे तीने डॉक्टर



होण्याचे स्वप्न खरे होणार आहे. खासगी महाविद्यालयात तिला एमबीबीएसला प्रवेश घेऊन डॉक्टर होण्याचे तिचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण जिवाचे रान करणार असल्याची माहिती वैष्णवीचे चुलते धनंजय देशमुख यांनी दिली. वैभवीने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केल्याने तिचे कौतुक होत आहे.

संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी व मुलगा विराज यांच्या शिक्षणाची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, उदय सामंत, खासदार सुप्रिया सुळे, संभाजीराजे आदींनी घेतलेली आहे. तसेच शुक्रवारी धनंजय देशमुख यांचा मुलगा सत्यजित व विराज यांचा प्रवेश रेठरेधरण (जि. सांगली) येथील सैनिकी विद्यालयात प्रवेश निश्चित केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याशी संवादही साधला होता. आपली मुलगी वैभवी ही डॉक्टर व्हावी, यासाठी संतोष देशमुख यांनी तिला लातूरमध्ये शिक्षणासाठी ठेवले होते. अधून-मधून ते तिला भेटायला जात असत. अखेर संतोष देशमुख यांचे स्वप्न आता सत्यात उतरणार आहे. आता तिला कोणत्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळतो, याकडे लक्ष लागले आहे.

# मुलांमधील किडनी संसर्ग: लक्षणे, कारणे आणि परिणाम

**पालक म्हणून आपण आपल्या मुलांच्या आरोग्याची अधिक काळजी घेण्याला प्राधान्य देतो. पण, आरोग्याला धोका असलेला आजार निदर्शनास आला नाही तर आणि खूप उशीर होईपर्यंत त्याकडे दुर्लक्ष केले तर? मुलांमध्ये किडनी संसर्ग हे तुम्ही करू शकणाऱ्या विचारापेक्षा अधिक सामान्य आहेत आणि उपचार न केल्यास ते गंभीर गुंतागुंत निर्माण करू शकतात, जसे किडनीचे नुकसान किंवा किडनी निकामी होणे. किरकोळ संसर्गामुळे जीवघेणा आजार होऊ शकतो. मुलांचे आरोग्य जपण्यासाठी धोक्याची लक्षणे जाणून घेणे, हे का घडते हे समजून घेणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच निमित्ताने डॉ. निशा कृष्णमूर्ती, कन्सल्टण्ट पेडिएट्रिक नेफ्रोलॉजी, नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल यांच्याशी केलेली बातचीत.**

**हॅलो डॉक्टर**

**लोकारोग्य**


१] मुलांमधील किडनी संसर्गाची धोक्याची लक्षणे कोणती असतात?

किडनी संसर्गांची लक्षणे दिसून येत नाहीत, ज्यामुळे त्यांचे निदान करणे आव्हानात्मक ठरते. उच्च ताप (बहुतेकदा १०२ अंश फॅरेनहाइट किंवा ३९ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त),थंडी वाजून येणे आणि थरथरणे,पाठीच्या खालच्या भागात, बाजूला किंवा पोटात वेदना,वारंवार लघवी होणे किंवा लघवी करण्यास त्रास होणे फिकट, दुर्गंधीयुक्त किंवा रक्ताळलेली लघवी,उलट्या आणि मळमळ,थकवा आणि चिडचिड,कमी भूक किंवा वजन कमी होणे

या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने किडनीचे कायमचे नुकसान होऊ शकते, म्हणून लवकर निदान आणि वैद्यकीय हस्तक्षेप आवश्यक आहे.

२] या किडनी संसर्गाची सामान्य कारणे काय आहेत?

मूत्राशयातून मूत्रपिंडात जीवाणू जातात तेव्हा किडनी संसर्ग होतात. विविध घटक धोका वाढवू शकतात:यूरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन्स (यूटीआय) यामुळे यूटीआयमुळे किडनी संसर्गांचे परिणाम अधिक गंभीर होऊ शकतात, (पायलोनेफ्रायटिस किंवा गळू तयार होणे). अनियमितपणे लघवी बाहेर पडणे आणि कमी पाणी पिणे. हि देखील कारण आहेत.त्याशिवाय लघवी थांबत-थांबत होणे,लघवी थांबत-थांबत झाल्याने मूत्राशयात बॅक्टेरिया वाढू शकतात.संरचनेत असामान्यता काही मुले मूत्रमार्गातील दोषांसह जन्माला येतात, ज्यामुळे संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते. बद्धकोष्ठता - भरलेले मल मूत्राशयावर दाब निर्माण करू शकते, ज्यामुळे मूत्रप्रवाहामध्ये अडथळा येतो आणि संसर्गाचा धोका वाढतो.



३] मुलांमधील किडनी संसर्गांचे परिणाम काय होऊ शकतात?

उपचार न केल्यास यूटीआयमुळे किडनी संसर्गांचे परिणाम अधिक गंभीर होऊ शकतात, (पायलोनेफ्रायटिस किंवा गळू तयार होणे). वारंवार संसर्ग झाल्यास व्रण येऊ शकतात आणि किडनीचे कार्य कमी होऊ शकते. किडनीच्या समस्यांमुळे दीर्घकालीन उच्च रक्तदाब होऊ शकतो, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका वाढतो.

४] किडनी संसर्ग होऊ नये म्हणून उपचार काय आहेत?

डॉक्टर लघवी चाचण्या, रक्तचाचण्या आणि कधी-कधी अल्ट्रासाऊंड किंवा स्कॅनद्वारे किडनीच्या संसर्गाचे निदान करतात. उपचारांमध्ये सामान्यतः पुढील प्रक्रियांचा समावेश असतो: संसर्ग काढून टाकण्यासाठी प्राथमिक उपचारबॅक्टेरिया बाहेर काढण्यासाठी योग्यरित्या लघवी होण्यास मदत करते. गंभीर केसेसमध्ये IV अँटीबायोटिक्स आणि देखरेखीची आवश्यकता असू शकते.किडनी संसर्ग गंभीर असू शकतात, पण पालक त्यांचा धोका कमी करण्यासाठी काही पावले उचलू शकतात: मुलांना भरपूर प्रमाणात पाणी पिण्यास सांगा.पुढून मागे असे स्वच्छ पुसून काढण्यासह योग्य स्वच्छतेबाबत शिकवा. ते अधिक वेळेपर्यंत लघवी करणे थांबवून ठेवणार नाहीत याची खात्री घ्या. फायबरयुक्त आहारासह बद्धकोष्ठतेच्या समस्यांवर उपाय करा.

## जागतिक कर्करोग नियंत्रणासाठी WHO सहयोग केंद्राचा नवीन अध्याय

**आरोग्यनिती**

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट सेंटर फॉर ग्लोबल हेल्थ (यूएस एनसीआय-सीजीएच) आणि जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) यांनी जागतिक कर्करोग नियंत्रण मजबूत करण्यासाठी त्यांच्या सहकार्याचे नूतनीकरण केले आहे, 8 वर्षांच्या यशस्वी सहकार्यावर आधारित आणि उदयोन्मुख प्राधान्यांना संबोधित करण्यासाठी त्यांच्या संयुक्त कार्याचा विस्तार केला आहे.

नवीन भागीदारी करारात, यूएस एनसीआय, डब्ल्यूएचओ सहयोग केंद्र (डब्ल्यूएचओसीसी) म्हणून त्याच्या भूमिकेत , कर्करोग नियंत्रण योजनांच्या विकास, अंमलबजावणी आणि खर्चात डब्ल्यूएचओला पाठिंबा देण्यासाठी क्रियाकलाप सुरू ठेवेल, विशेषतः धोरण अंमलबजावणी संशोधनाद्वारे प्रशासन आणि जबाबदारीच्या पैलूंवर लक्ष केंद्रित करेल. हे सहयोगी कार्य आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण भागीदारी (आयसीसीपी) च्या सह-संयोजक म्हणून यूएस एनसीआयवर आधारित आहे.कर्करोग देखरेख, आरोग्य डेटाचा वापर आणि स्थानिक संदर्भांशी संबंधित धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे त्यांचे स्थापित लक्ष्य साध्य करण्यासाठी प्रगती करण्यास सक्षम करण्यासाठी यूएस एनसीआय डब्ल्यूएचओसीसी गर्भाशयाच्या ग्रीवे, स्तन आणि बालपणातील कर्करोगांमध्ये डब्ल्यूएचओ ग्लोबल कॅन्सर इनिशिएटिव्हजना देखील समर्थन देईल . शेवटी, यूएस एनसीआय डब्ल्यूएचओसीसी सुरुवातीच्या कारकिर्दीच्या शास्त्रज्ञांना सहभागी करून आघाडीच्या कर्करोग महामारीशास्त्रज्ञांचे नेटवर्क तयार करण्यावर लक्ष केंद्रित करेल.

## औषधी सुंठ

**आरोग्यम् धनसंपदा**



सुक्या आल्याच्या पावडरला सुंठ असे म्हणतात. ताजे आले सुकल्यानंतर त्यातून काढलेली ती तीव्र वासाची पावडर आहे. आपण ते स्वयंपाक करण्यासाठी आणि बऱ्याच वर्षांपासून औषध म्हणून वापरू शकता. हजारो वर्षांपासून आयुर्वेदात कोरडे आले औषध म्हणून वापरले जात आहे. याचे कारण असे की आले आणि कोरडे आले हे अँटिऑक्सिडंट्स आणि बीटा-कॅरोटीन, कॅप्सेसिन आणि कर्क्यूमिन यांसारख्या दाहक-विरोधी रसायनांनी समृद्ध असतात.कोरडे आले तुमच्या चेहऱ्याला हायड्रेट करण्यासाठी आणि तरुण ठेवण्यासाठी खूप फायदेशीर आहे. हे टोनर म्हणून वापरले जाऊ शकते. डोकेदुखीच्या उपचारात कोरड्या आल्याचा एक उत्तम उपयोग आहे. सामान्य डोकेदुखीमध्ये, कोरड्या आल्याच्या पावडरची पेस्ट कपाळावर लावल्याने या वेदना कमी होण्यास मदत होते. मान आणि खांदे दुखत असल्यास ही पेस्ट मानेवरही लावता येते. सर्दी आणि फ्लूच्या बाबतीत छातीत जड होणे आणि घसा खवखवणे खूप सामान्य आहे. अशा परिस्थितीत सर्दीपासून सुटका मिळवण्यासाठी कोरडे आले या मार्गांनी वापरता येते. कोरडे आले किंवा आल्याच्या पावडरपासून बनवलेला चहा दिवसातून अनेक वेळा सर्दीवर उपचार करण्यासाठी वापरा. सुक्या आल्यामध्ये थर्मोजेनिक घटक असतात जे चरबी जाळण्यात आणि लठ्ठपणा कमी करण्यास मदत करतात.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

## वीज कोसळून एकाच कुटुंबातील तीन ठार

**जळगाव, दि. १६ प्रतिनिधी**

चाळीसगाव तालुक्यात शेतातील झाडावर वीज कोसळून त्याखाली आश्रयाला थांबलेले एकाच कुटुंबातील तीनजण ठार झाले. या घटनेत इतर दोन जण जखमी झाले आहेत. ही हृदयद्रावक घटना कोंगानगर येथे १५ जून रोजी दुपारी २ वाजता घडली.

दशरथ उदल पवार (वय २४), त्याचा पुतण्या दिलीप पवार (१४, दोघे रा. कोंगानगर) आणि शालक समाधान प्रकाश राठोड (९, रा. जेहूर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर) यांचा अशी मृतांची नावे आहेत. मयत दशरथ याचा १५ दिवसांपूर्वीच विवाह झाला होता. उदल गणपत पवार व दिलीप उदल पवार हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. पवार कुटुंबीय गावानजीकच्या शेतात रविवारी कपाशी लागवड करण्यासाठी गेले होते.

दुपारी दोन वाजता वादळी वाऱ्यासह पावसासह विजांचा कडकडाट सुरू झाला. त्यामुळे सर्वजण शेतातील झाडाच्या आडोशाला उभे राहिले. काही क्षणातच झाडावर वीज कोसळल्याने तिघे जागीच ठार झाले. एकाच कुटुंबातील तीनजणांचा मृत्यू झाल्याने कोंगानगरात शोककळा पसरली होती. कुटुंबीयांचा आक्रोश पाहून अनेकांना अश्रू अनावर झाले. रात्री उशिरा तीनही जणांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच आमदार मंगेश चव्हाण यांच्यासह प्रांताधिकारी प्रमोद हिले, तहसीलदार प्रशांत पाटील, नायब तहसीलदार संदेश निकुंभ, प्रथमेश मोहोड हे घटनास्थळी पोहोचले. आमदार चव्हाण यांनी शासनाकडून देण्यात येणाऱ्या मदतीबाबतही प्रशासनाला सूचना दिल्या.

## कोणी बोलल्यावर आपण हसलो तर आरोपी होतो का?- सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली, दि. १६ वृत्तसंस्था**

पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्या एका महत्त्वपूर्ण निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने तेलुगू पत्रकार कोम्मिनेनी श्रीनिवास राव (केएसआर) यांना जामीन मंजूर केला. एका टीव्ही कार्यक्रमात पॅनेलिस्टच्या आक्षेपार्ह वक्तव्यानंतर त्यांना आंध्र प्रदेश पोलिसांनी अटक केली होती. केएसआर हे ७० वर्षांचे ज्येष्ठ पत्रकार व टीव्ही अँकर असून, 'लाइव्ह विथ केएसआर' हा कार्यक्रम साक्षी टीव्हीवर सादर करतात. ६ जून २०२५ रोजी या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणादरम्यान एका पॅनेलिस्टने अमरावती (आंध्र प्रदेश) ही वेश्यांची राजधानी आहे. तेथे एड्सग्रस्त लोक राहतात, असे विधान केले. केएसआर यांनी या वक्तव्यावर आक्षेप घेतला नाही, उलट ते हसताना दिसले, असा केएसआर यांच्यावर आरोप आहे. मुकुल रोहतगी, सिद्धार्थ लुथरा आणि अन्य वकिलांनी युक्तिवाद केला की, केएसआर हे निष्क्रिय प्रेक्षक नव्हते. त्यांनी पॅनेलिस्टला उत्तेजन दिले. त्यांच्या हसण्याने वक्तव्याला अप्रत्यक्ष अनुमती दिली. त्यांना नियमित जामिनासाठी उच्च न्यायालयात जाण्यास सांगावे. तथापि, न्या. प्रशांत कुमार मिश्रा व न्या. मनमोहन यांच्या खंडपीठाने हा पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचा मुद्दा असल्याने उच्च न्यायालयात पाठविण्यास नकार दिला. न्यायालयाने विचारले, 'जर कुणी विचित्र विधान केले आणि आपण त्यावर हसलो, तर त्यामुळे आपण सहआरोपी ठरतो का? लाइव्ह कार्यक्रमांमध्ये असे प्रकार नेहमी घडतात. पत्रकाराची प्रतिष्ठा आणि भूमिका लक्षात घेता त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.' ८ जून २०२५ रोजी केएसआर यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या द्वेषभावना पसरवणे, खोटे पुरावे, शासकीय कर्मचाऱ्यावर हल्ला, सदोष मनुष्यवध, दरोडा, कट रचणे यासाठी विविध कलम माहिती तंत्रज्ञान अधिनियम व अॅट्रॉसिटी अॅक्ट खाली गुन्हा नोंदविण्यात आला. केएसआर यांना ९ जूनला अटक करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयात ज्येष्ठ वकील सिद्धार्थ दवे, अॅड. श्रीवर्धन धूत व रामेश अल्लांकी यांनी युक्तिवाद केला की, केएसआर यांनी स्वतः कोणतेही वक्तव्य केले नाही किंवा पॅनेलिस्टच्या वक्तव्याला दुजोरा दिला नाही. ते केवळ अँकरिंग करत होते. हसणे म्हणजे गुन्ह्यात मदत नव्हे.

## चॅम्पियनशिप जिंकूनही दक्षिण आफ्रिकेला मिळाले नाही क्रमांक 1 चे स्थान

**लंडन, दि. १६ वृत्तसंस्था**

शनिवार १४ जून रोजी इंग्लंडच्या लॉर्ड्स मैदानावर झालेल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा ५ विकेटने पराभव करून सामना जिंकला. तब्बल २७ वर्षांनी त्यांनी आयसीसी ट्रॉफी जिंकली, मात्र टेस्ट चॅम्पियनशिप जिंकूनसुद्धा आयसीसी टेस्ट क्रमवारीत त्यांना क्रमांक १ चं स्थान मिळवता आलं नाही. २०२३–२५ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप त्यांनी जिंकली, पण टेस्ट क्रमवारीत ते सर्वोच्च स्थान मिळवू शकले नाहीत. ऑस्ट्रेलियाने क्रमांक १ वर आपलं वर्चस्व कायम ठेवलं, तर दक्षिण आफ्रिका क्रमांक २ वर राहिली.



आयसीसीकडून नवीन टेस्ट क्रमवारी जाहीर करण्यात आली. ज्यात पुरुषांच्या टेस्ट संघ क्रमवारीत ऑस्ट्रेलिया १२३ रेटिंगसह क्रमांक एकवर असून, दक्षिण आफ्रिका ११४ रेटिंगसह क्रमांक २ वर आहे. त्या खालोखाल इंग्लंडचा संघ ११३ रेटिंगसह क्रमांक ३ वर असून, क्रमांक ४ वर १०५ रेटिंगसह भारत आहे.

टेस्ट संघ क्रमवारीत भारतीय संघाबाबत बोलायचं झालं तर टीम इंडिया ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड मालिकेत पराभूत झाल्यानंतर चौथ्या स्थानावर घसरली. आता शुभमन गिलच्या नेतृत्वात टीम इंडिया २० जूनपासून इंग्लंडविरुद्ध टेस्ट मालिका खेळणार आहे. तेव्हा यात टीम इंडिया इंग्लंडला पराभूत करून टेस्ट क्रमवारीत पहिल्या तीनमध्ये स्थान मिळवते का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe**

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com**
RNI No.: MAHAMAR/2014/62313